


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक १२९ * नांदेड * शनिवार, दि. १६ मे २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# शैक्षणिक क्षेत्रात खळबळ! आरसीसी क्लासेसचे मोटेगावकर यांची सीबीआयकडून आठ तास चौकशी

## नीट पेपरफूटी प्रकरण

**लातूर (प्रतिनिधी)–** देशभरात गाजत असलेल्या 'नीट' पेपर फुटी प्रकरणाचे धागेदोरे आता लातूरपर्यंत येऊन पोहोचले आहेत. या प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाची (सीबीआय) टीम सलग दुसऱ्या दिवशी 'अ‍ॅक्शन मोड'मध्ये दिसून आली. लातुरातील प्रसिद्ध 'आरसीसी' कोचिंग क्लासेसचे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर यांची सीबीआयने तब्बल तास चौकशी केली. यामुळे शैक्षणिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सीबीआयचे एक पथक शुक्रवारी मोटेगावकर यांच्या 'ओमकार रेसिडेन्सी' या निवासस्थानी धडकले. तब्बल आठ तास चाललेल्या या चौकशीनंतर सीबीआयचे अधिकारी काही बॅगा आणि कागदपत्रे घेऊन बाहेर पडले. तिथून हे पथक थेट शासकीय विश्रामगृहाकडे रवाना झाले. या चौकशी दरम्यान नेमके काय निष्पन्न झाले, याबाबत सीबीआयने अधिकृतरीत्या कोणतीही माहिती दिलेली नाही.

मोटेगावकर यांच्या चौकशीची बातमी पसरताच काही प्रसारमाध्यमांनी त्यांना अटक झाल्याचे वृत्त प्रसारित केले होते. मात्र, या वृत्ताचे मोटेगावकर यांच्या कुटुंबियांनी खंडन केले आहे. प्रा. शिवराज मोटेगावकर यांना अटक झालेली नाही. केवळ चौकशीसाठी त्यांना बोलावण्यात आले होते. अटकेच्या बातम्या चुकीच्या आणि अफवा आहेत, असे त्यांच्या कुटुंबियांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

एका पालकाने पोलिसांत तक्रार दिली होती की, लातुरातील एका खासगी संस्थेच्या सराव परीक्षेत आलेले ४२ प्रश्न हे मूळ 'नीट' परीक्षेतील प्रश्नांशी




तंतोतंत जुळणारे होते. यापूर्वी सीबीआयने लातूरमधून निवृत्त प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी यांना ताब्यात घेतले आहे, जे एकेकाळी नीटच्या पेपर सेटिंग कमिटीमध्ये होते. त्यांच्याशी असलेल्या संबंधांच्या पार्श्वभूमीवर ही चौकशी होत असल्याची चर्चा आहे.

'लातूर पॅटर्न'मुळे शिक्षणाचे माहेरघर मानल्या जाणाऱ्या या शहरात सीबीआयच्या या मोठ्या कारवाईने शैक्षणिक संस्थाचालकांचे धाबे दणाणले आहेत. सीबीआयच्या २८ सदस्यांचे पथक सध्या लातूरमध्ये तळ ठोकून असून, आगामी काळात आणखी काही मोठे खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, गेल्या २४ तासात जयपूर, गुरुग्राम, नाशिक, पुणे आणि अहिल्यानगर यांसह अनेक ठिकाणी सीबीआयकडून शोधमोहीम राबवण्यात आली आहे. या मोहिमांदरम्यान, अनेक गुन्हेगारी पुरावे ठरू शकणारी कागदपत्रे, इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि मोबाइल फोन जप्त करण्यात आले आहेत. आतापर्यंत, या प्रकरणाच्या संदर्भात एकूण सात आरोपींना अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने यातील पाच आरोपींना सात दिवसांच्या पोलीस कोठडीत पाठवले आहे, तर पुण्यातून ताब्यात घेण्यात आलेल्या दोन संशयितांना 'ट्रान्झिट रिमांड'वर दिल्लीला नेण्यात आले आहे.

या प्रकरणाच्या संदर्भात, सीबीआयने गुरुवारी लातूरमधील 'आरसीसी कोचिंग क्लासेस' या नामांकित साखळीचे संचालक शिवराज मोटेगावकर यांची सुमारे ८ तास कसून चौकशी केली होती. वैद्यकीय प्रवेश परीक्षांच्या तयारीसाठीच्या अभ्यासक्रमांमुळे मोटेगावकर यांची ही कोचिंग संस्था महाराष्ट्रात सर्वत्र ओळखली जाते. त्यांच्या कोचिंग संस्थेने वितरित केलेल्या सराव चाचण्यांमधील प्रश्न हे 'नीट' परीक्षेत प्रत्यक्षात विचारलेल्या प्रश्नांशी मिळतेजुळते होते, अशा आरोपांची सीबीआय सध्या चौकशी करत आहे. या घडामोडीनंतर, लातूरमधील कोचिंग क्षेत्राचीच आता कसून तपासणी केली जात आहे.

# पेपरफुटीमुळे रद्द झालेल्या नीटची पुनर्परीक्षा आता २१ जूनला होणार

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पेपरफुटीमुळे रद्द झालेल्या नीटची पुनर्परीक्षा आता २१ जून २०२६ रोजी होणार आहे. याबाबत शुक्रवारी एनटीएकडून घोषणा करण्यात आली आहे. ३ मे रोजी झालेली परीक्षा पेपरफुटीच्या घटनांमुळे नीटची परीक्षा रद्द करण्यात आली होती.




पेपरफुटी प्रकरणामुळे रद्द करण्यात आलेली नीटच्या पुर्नरपरीक्षेची तारीख जाहीर करण्यात आली आहे. एनटीएकडून २१ जूनला नीट पुर्नपरीक्षा होणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. ही परीक्षा जून महिन्यात होणार असल्याने पुढील प्रवेशांचे वेळापत्रक कोलमडणार आहे. नीट परीक्षेतील पेपरफुटीमुळे देशभरात मोठी खळबळ उडाली होती. वर्षभर तयारी करुन परीक्षा दिल्यानंतर ही परीक्षा रद्द करण्यात आल्यामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये संताप निर्माण झाला होता.

### विद्यार्थ्यांना नीट परीक्षा शुल्क परत दिले जाणार, पुर्नपरीक्षेचं शुल्क नाही

राष्ट्रीय चाचणी संस्थेने नीट–युजी परीक्षेची नवीन तारीख जाहीर केली. ही परीक्षा आता रविवार, २१ जून रोजी होणार आहे. पेपरफुटीच्या शक्यतेमुळे एनटीएने १२ मे रोजी ही परीक्षा रद्द केली होती. यापूर्वी ही परीक्षा ३ मे रोजी भारतातील ५५१ आणि परदेशातील १४ शहरांमध्ये घेण्यात आली होती. या परीक्षेसाठी ५,४०० हून अधिक परीक्षा केंद्रे उभारण्यात आली होती. २२.७९ लाख विद्यार्थी परीक्षेला बसले होते.

# मान्सून २६ मे रोजी केरळात दाखल होणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** पुढील ४८ तासांत दक्षिण अंदमान समुद्र, बंगालचा उपसागर आणि अंदमान–निकोबार बेटांमध्ये मान्सूनच्या आगमनासाठी अनुकूल वातावरण तयार होत आहे. १६ मेच्या आसपास मान्सून अंदमान परिसरात दाखल होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर २६ मे रोजी मान्सून केरळात दाखल होणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. यामुळे शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# पोटच्या मुलाकडून वडिलांचा दगडाने ठेचून खून

## कंधार तालुक्यातील हटक्याळ येथील घटना

**नांदेड (प्रतिनिधी)–** कंधार तालुक्यातील हटक्याळ येथे किरकोळ घरगुती कारणावरून झोपेत असलेल्या वडिलांच्या डोक्यात दगड घालून पोटच्या मुलाने निर्घृण खून केल्याची घटना दि. १४ मे रोजी रात्री घडली.

हटक्याळ ता. कंधार येथील रहिवासी सुरेश बाबुराव मोरे (वय ४८) हे गुरुवार, दि. १४ मे रोजी रात्री आपल्या कुटुंबासह जेवण करून नेहमीप्रमाणे झोपले होते. रात्री ११ वाजेच्या सुमारास सर्वजण गाढ झोपेत असताना त्यांचा लहान मुलगा सुदर्शन सुरेश मोरे (वय २७) याने क्रूरतेचा कळस गाठला. त्याने झोपेत असलेल्या वडिलांच्या डोक्यावर दगडाने जोरात प्रहार केला. हा हल्ला इतका भीषण होता की, सुरेश मोरे यांचा जागीच मृत्यू झाला.

यावेळी घरात मयताची आई चौत्राबाई मोरे, वडील बाबुराव मोरे आणि भाऊ सुजित मोरे हे देखील उपस्थित होते. या घटनेनंतर मयताची आई चौत्राबाई बाबुराव मोरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कंधार पोलीस ठाण्यात आरोपी सुदर्शन याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हत्या केल्यानंतर आरोपी सुदर्शन याने




अंधाराचा फायदा घेऊन गावातून पळ काढला होता. मात्र, घटनेची माहिती मिळताच कंधार पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. खुनी सुदर्शन यास पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव, सहायक पोलीस निरीक्षक विकास कोकाटे, पोलीस हवालदार टाकरस, गुंडरे, क्षीरसागर, हटक्याळ चे पोलीस पाटील, सरपंच, ग्रामस्थ व तांत्रिक साह्याची मदत घेऊन अवघ्या पाच तासांत आरोपी सुदर्शन यास पकडून जेरबंद केले आहे.

# पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतीत प्रतिलिटर ३ रूपयांनी वाढ

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** इराण आणि अमेरिका युद्धाची झळ थेट भारतीय नागरिकांना सहन करावी लागत आहे. सरकारने मोठा निर्णय घेत पेट्रोल डिझेल याच्या किमतीत वाढ केली. पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीमध्ये प्रति ३ रूपयांनी वाढ करण्यात आली. हा सर्वसामान्य लोकांना मोठा झटका म्हणावा लागणार आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारात रूपया घसरत आहे. इराण आणि अमेरिका युद्धाचा मोठा परिणाम होत आहे. सोने आणि चांदीच्या भावानंतर सरकार एका मागून एक मोठे निर्णय घेत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम झाले आहेत. साखरेच्या निर्यातीवर बंदी घालण्यात आली.




इराण अमेरिका युद्धात होर्मुज खाडी बंद असल्याने एलपीजी गॅस, पेट्रोल डिझेल यांची मोठी समस्या आहे. भारत मोठे प्रयत्न पेट्रोल आणि डिझेल भारतात आणण्याकरिता प्रयत्न करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेला पेट्रोल आणि डिझेलचा वापर कमी करण्याचे मोठे आवाहन केले. एक वर्षाकरिता सोने खरेदी न करण्याचे आवाहन पंतप्रधान मोदी यांनी केले. त्यानंतर आता थेट पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीमध्ये मोठी वाढ करण्यात आली. आंतरराष्ट्रीय बाजारात सतत रूपयाची घसरण सुरू आहे. त्याचेच परिणाम आता बघायला मिळत आहे.

सरकारकडून हे नवे दर आजपासून लागू करण्यात आलेत. आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाचा भाव वाढल्याने ही वाढ केल्याचे सांगितेल जातंय. सरकारने काही दिवसांपूर्वीच स्पष्ट केले होते की, पेट्रोल आणि डिझेलचे भाव वाढवले जाणार नाहीत. मात्र, इराण आणि अमेरिका युद्धात सतत जागतिक बाजारात कच्च्या तेलाचे भाव वाढत आहेत. यादरम्यानच आता भारतातही पेट्रोल आणि डिझेलचे भाव वाढवण्यात आले आहेत.

# महाराष्ट्रातील २४ आयपीएस अधिकाऱ्यांच्या तडकाफडकी बदल्या

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील २४ अपर पोलीस महासंचालक तसेच विशेष पोलीस महानिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. नाशिकचे विशेष पोलीस महासंचालक दत्ता कराळे यांची बदली झाली आहे. त्यांच्या जागी प्रवीण पडवळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्यातील २४ अपर पोलीस महासंचालक पदावरील वरिष्ठ अधिकाऱ्यांचीदेखील बदली करण्यात आली आहे. यामध्ये पोलीस उपम हानिरीक्षक मोक्षदा पाटील, प्रियांका नारनवरे, तेजस्वी सातपुते, अशोक दुधे, दिक्षीत गेडाम, कृष्णकांत उपाध्याय, प्रवीण मुंढे, योगेश गुप्ता, राकेश ओला, महेश्वर रेड्डी या विशेष पोलीस महानिरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

यासह अपर पोलीस महासंचालक पदावरील कृष्ण प्रकाश यांची अपर पोलीस महासंचालक, फोर्स वन येथून अपर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण) पदावर बदली करण्यात आली. दत्ता कराळे यांची विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथून विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य मानवी हक्क आयोग पदावर बदली करण्यात आली. प्रविण पडवळ यांची विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण येथून विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक पदावर बदली करण्यात आली. लखमी गौतम यांची पोलीस सह आयुक्त (गुन्हे), बृहन्मुंबई येथून विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था), महाराष्ट्र राज्य, मुंबई पदावर बदली करण्यात आली. मनोज शर्मा यांची विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था), महाराष्ट्र राज्य, मुंबई येथून पोलीस सह आयुक्त (कायदा व सुव्यवस्था), बृहन्मुंबई पदावर बदली करण्यात आली. सुहेल हक यांची विशेष पोलीस महानिरीक्षक (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई येथून पोलीस सह आयुक्त (प्रशासन), मुंबई पदावर बदली करण्यात आली. महेश पाटील यांची अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, मुंबई येथून विशेष पोलीस महानिरीक्षक (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई पदावर पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली. परमजीत दहिया यांची अपर पोलीस आयुक्त, मुंबई येथून विशेष पोलीस महानिरीक्षक, दहशतवाद विरोधी पथक पदावर पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली. सी. के. मीणा यांची विशेष पोलीस महानिरीक्षक, दहशतवाद विरोधी पथक येथून विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र पदावर बदली करण्यात आली.

# शहरातील अनधिकृत होर्डिंग्स व बॅनर्सवर कठोर कारवाई करण्याबाबत संयुक्त बैठक

## राज्य शासन व उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार होणार कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील अनधिकृत होर्डिंग्सवर धडक कारवाई करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन येथे सर्वपक्षीय नेते, लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण संयुक्त बैठक संपन्न झाली.

या बैठकीस महापौर कविता संतोष मुळे, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, पोलीस उपविभागीय अधिकारी रामेश्वर व्यंजने, प्रशांत शिंदे, उपमहापौर दिपकसिंह रावत, स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंग गाडीवाले, महिला बाल कल्याण सभापती सदिच्छा सोनी पाटील, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, अतिरिक्त आयुक्त निलेश संकेवार, उपायुक्त अजितपालसिंघ संधू सर्वपक्षीय नेते आणि विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी होते.


बैठकीच्या प्रारंभी महापालिकेच्या



वतीने राज्य शासनाने निर्देशीत केल्याप्रमाणे व उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र.१५५/२०११ मधील दि. ३१ जानेवारी २०१७ रोजीच्या आदेशानुसार आकाशचिन्ह व जाहिरात विनियम व नियंत्रण कार्यपध्दती संदर्भात सादरीकरण करण्यात आले. शहरातील वाढती बॅनरबाजी रोखण्यासाठी मनपा आणि पोलीस दल मिळून अनधिकृत होर्डिंग्सवर संयुक्तपणे निष्कासन कारवाई करणार आहे. कारवाई दरम्यान मनपा कर्मचाऱ्यांना पूर्ण पोलीस संरक्षण देण्याचे पोलीस अधीक्षकांनी यावेळी आश्वासन दिले आहे. तसेच विनापरवाना होर्डिंग लावणाऱ्यांवर आणि संबंधितावर थेट फौजदारी गुन्हे दाखल होणार आहेत.कायदेशीर होर्डिंग्सचे देखील सुरक्षिततेच्या दृष्टीने तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे आदेश यावेळी देण्यात आले. शहरात पालिकेने एकुण १६७ अधिकृत जाहिरात फलक उपलब्ध करुन दिले आहेत. त्याप्रमाणे अनधिकृत मोठ्या होर्डींग्सवर दंड आकारण्याचे धोरण आखण्यात येणार आहे.

बैठकीत मनपाच्यावतीने आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी आपली भुमिका मांडताना शहरात होर्डीग्सवर बंदी नसुन अनधिकृत होर्डींग्सवर बंदी असल्याचे स्पष्ट केले. महापालिकेने होर्डींग्ससाठी ऑनलाईन स्वरुपात परवानगीची सुविध उपलब्ध करुन दिली असुन ४८ तासांच्या आत परवानगी मिळेल अशी व्यवस्था असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी अनधिकृतपणे होर्डिंग व बॅनरमुळे शहराचे विद्रुपीकरण होणे ही चांगली बाब नसल्याचे स्पष्ट केले. महापालिकेने बॅनर, होर्डींग्स संदर्भातील धोरण सर्वसमावेश असून राजकीय मंडळींनी व नागरिकांनी त्याचे पालन करणे आवश्यक असल्याचे सांगितले. महापौर कविता संतोष मुळे यांनी नांदेड शहर अधिकृत बॅनर मुक्त कसे होईल या दृष्टीकोणातुन काम करतांना सर्वांना समान न्याय– समान कायदा हे धोरण स्विकारणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले.




# आता सोन्याच्या खरेदीवर मर्यादा, सरकारचा निर्णय

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** सरकार सोन्याच्या आयातीबाबत अधिक कठोर भूमि का घेत असल्याचे दिसत आहे. सोन्याच्या आयातीसंदर्भातील नियमांमध्ये सरकारनं पुन्हा एकदा सुधारणा केली आहे. आयात होणाऱ्या सोन्याच्या प्रमाणावर मर्यादा घातली आहे. देशातील वाढत्या सोन्याच्या आयातीला आळा घालण्यासाठी सरकारने अधिक कडक नियम केले आहेत.

सोने खरेदीच्या बाबतीत सरकारनं मोठा निर्णय घेतला आहे. आता सोन्याच्या खरेदीवर मर्यादा आली आहे. परकीय व्यापार महासंचालनालयाने आपल्या नियम ांमध्ये किंचित बदल करुन, 'अ‍ॅडव्हान्स ऑथोरायझेशन स्कीम' अंतर्गत एका वेळी जास्तीत जास्त १०० किलोग्रॅम सोन्याच्या आयातीला परवानगी दिली आहे. यापूर्वी यासाठी कोणतीही निश्चित मर्यादा नव्हती. त्यामुळं सोन्याच्या खरेदीवर आता मर्यादा आली आहे. याआधी सोन्याच्या खरेदीवर कोणतीही मर्यादा नव्हती, आता मात्र बंधने



असणार आहेत.

'अ‍ॅडव्हान्स ऑथोरायझेशन स्कीम' अंतर्गत, दागिन्यांच्या निर्यातदारांना सोने आणि इतर कच्चा माल शुल्कमुक्त आयात करण्याची परवानगी आहे. याचा उपयोग दागिने आणि निर्यातीसाठी इतर उत्पादने तयार करण्यासाठी केला जातो. सरकारने आता या योजनेत अनेक नवीन अटी जोडल्या आहेत. प्रथमच अर्ज करणाऱ्या कोणत्याही युनिटचे प्रत्यक्ष अस्तित्व, त्याची उत्पादन क्षमता आणि ते कार्यरत आहे की नाही, हे तपासण्यासाठी प्रत्यक्ष तपासणी केली जाईल.

# सुनील तटकरे राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष नाहीत? प्रफुल पटेल कार्याध्यक्ष नाहीत?

**मुंबई (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या यादीवरून पुन्हा एकदा राजकीय वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने केंद्रीय निवडणूक आयोगाला दिलेल्या पक्षात खासदार सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांच्या नावासमोर अनुक्रमे प्रदेशाध्यक्ष आणि राष्ट्रीय कार्याध्यक्ष हे पद नमूद केलं नाही. त्यामुळे ही दोन्ही नेते पक्षांच्या त्या त्या पदांवर आहेत की नाही असा प्रश्न आता पुन्हा उपस्थित होत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून केंद्रीय निवडणूक आयोगाला २९ एप्रिल रोजी एक पत्र देण्यात आलं आहे. या पत्रात अरुणाचल प्रदेशचे प्रदेशाध्यक्ष टोको तातूंग यांचा नावासमोर प्रदेशाध्यक्ष म्हणून उल्लेख केला आहे. पण त्याच यादीत सुनिल तटकरे यांच्या नावासमोरच महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष असं नमूद केलं नाही. सुनील तटकरे यांच्या नावासमोर केवळ लोकसभेचे गटनेते म्हणून उल्लेख करण्यात आला आहे.

# मराठा आरक्षणासाठी पुन्हा रस्त्यावर उतरणार; जरांगे पाटलांचा एल्गार

**मुंबई (प्रतिनिधी)–** मराठा आरक्षणाचे आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आतापर्यंत अनेक आंदोलने करून मराठा समाजाचे प्रश्न सरकारपर्यंत पोहोचवले आहेत. गेल्या २–३ वर्षांत केलेल्या आंदोलनात त्यांना चांगले यश मिळाले आहे. मात्र सरकारने दिलेली आश्वासने पाळलेली नाहीत. त्यामुळे आता मनोज जरांगे पाटलांनी पुन्हा एकदा रस्त्यावर उतरून सरकारची झोप उडवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांनी मराठा आरक्षणासाठी पुन्हा रणशिंग फुंकले असून अंतरवाली सराटीतून आंदोलनाची घोषणा केली जाणार आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलनाची तारीख ठरवण्यासाठी मनोज जरांगे पाटील उद्या सकाळी अंतरवाली सराटी येथे जाहीर पत्रकार परिषद घेणार आहेच. त्यामुळे पुन्हा एकदा मराठा आरक्षणाच्या मागणीचा मुद्दा पेटण्याची शक्यता आहे. कारण कुणबी प्रमाणपत्र, हैदराबाद गॅझेट आणि आंदोलकांवरील गुन्हे यासारख्या विषयांवरून जरांगे यांनी सरकारवर पुन्हा एकदा निशाणा साधला आहे.

मनोज जरांगे पाटलांनी सरकारला प्रश्न विचारताना म्हटले की, '८ महिने उलटून गेले असले तरीही तुम्ही प्रमाणपत्र का दिले नाही? सातारा संस्थानचा जीआर १ महिन्यात काढू म्हटले होते, का नाही काढला? राज्यातील सगळे गुन्हे मागे घेण्याचं आश्वासन दिलं होतं, का नाही घेतले? शिवाय शिंदे समितीची मुदत वाढ आणि शिंदे समिती रेकॉर्ड शोधत नसल्याचं जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे, त्यामुळे आंतरवाली सराटीतून जरांगे पाटील काय बोलणार आणि काय त्यांची पुढची भूमि का असणार याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# इंधन बचत, पण कोणाकडून?

आज देश ऊर्जा बचतीबाबत जनजागृती करत असताना लोकप्रतिनिधींनीच विपरीत वर्तन केले तर नागरिकांमध्ये चुकीचा संदेश जातो. उलट साधेपणा आणि काटकसर स्वीकारणारे नेते लोकांच्या मनात विश्वास निर्माण करतात. महात्मा गांधींनी साधेपणातून नेतृत्व दिले. आजच्या काळातही तेच तत्त्व लागू होते. जनतेच्या पैशातून चालणाऱ्या व्यवस्थेत दिखाऊ खर्चाला स्थान असू नये. म्हणूनच इंधन बचतीचा संदेश देण्यात आलेला आहे. हा संदेश केवळ सामान्य नागरिकांसाठीच नसून सत्ताधाऱ्यांसाठीही तितकाच महत्त्वाचा आहे, हे अलीकडील घडा-मोडींनी स्पष्ट केले आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना काटकसरीचे आवाहन केल्यानंतर स्वतःच्या वाहन ताफ्यात कपात करून त्या संदेशाला कृतीची जोड दिली. त्यानंतर विविध भाजपशासित राज्यांतील मुख्यमंत्री, राज्यपाल आणि मंत्री यांनीही वाहनांचा वापर कमी करण्याचे निर्णय घेतले. वाढत्या इंधनदरांच्या पार्श्वभूमीवर आणि पर्यावरणीय संकटाच्या छायेत या निर्णयांकडे केवळ प्रतिकात्मक नव्हे, तर आवश्यक पाऊल म्हणून पाहिले पाहिजे. देशात पेट्रोल-डिझेलची मागणी सातत्याने वाढत आहे. भारतासारख्या विकसनशील देशाला मोठ्या प्रमाणावर इंधन आयातीवर अवलंबून राहावे लागते. जागतिक राजकारणातील तणाव, युद्धजन्य परिस्थिती आणि कच्च्या तेलाच्या चढ-उतारांचा थेट परिणाम सामान्य नागरिकांच्या खिशावर होतो. अशा वेळी सरकारने केवळ उपदेश न करता स्वतः उदाहरण घालून देणे अधिक परिणामकारक ठरते. पंतप्रधानांच्या ताफ्यातील वाहनसंख्या कमी करणे, शक्य त्या ठिकाणी इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढविणे किंवा सार्वजनिक वाहतुकीचा पर्याय स्वीकारणे, या गोष्टी लोकांमध्ये सकारात्मक संदेश देणाऱ्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनसंख्या अर्ध्यावर आणण्याचे आदेश दिले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी इलेक्ट्रिक वाहनाचा स्वीकार केला. गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी रेल्वे आणि सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्याचा निर्णय घेतला. उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड अशा अनेक राज्यांनीही ताफ्यांमध्ये कपात केली. ही केवळ खर्चकपात नाही; हा प्रशासनातील जबाबदारीचा आणि साधेपणाचा संदेश आहे. मात्र, या निर्णयांची खरी परिणामकारकता तेव्हा दिसेल जेव्हा ही मानसिकता स्थानिक स्वराज्य संस्थांपर्यंत पोहोचेल. अनेक शहरांमध्ये नगरसेवक, पदाधिकारी, शासकीय अधिकारी आणि स्थानिक नेते अल्प अंतरासाठीही अनेक वाहनांसह फिरताना दिसतात. काही ठिकाणी शासकीय कामांसाठी होणारा वाहनांचा अनावश्यक वापर ही जनतेच्या पैशांची उधळपट्टीच ठरते. शहरातील रस्त्यांवर वाढणारी वाहतूक, ध्वनीप्रदूषण आणि इंधनाचा अपव्यय यामध्ये अशा दिखाऊ ताफ्यांचाही मोठा वाटा असतो. म्हणूनच आता नगरसेवकांनीही आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. जनतेसमोर आदर्श ठेवण्याची जबाबदारी केवळ मुख्यमंत्री किंवा मंत्र्यांची नाही. स्थानिक लोकप्रतिनिधींनीदेखील पेट्रोलच्या वापरा-मध्ये काटकसरीचे धोरण स्वीकारले पाहिजे. शक्य असेल तेथे एकाच वाहनातून प्रवास करणे, अल्प अंतरासाठी सायकल किंवा इलेक्ट्रिक वाहनांचा वापर करणे, अनावश्यक ताफे टाळणे आणि सार्वजनिक कार्यक्रमांना साधेपणाने उपस्थित राहणे, या गोष्टींची सुरुवात स्थानिक पातळीवरून झाली तर त्याचा प्रभाव अधिक व्यापक होईल. यासोबतच सरकारनेही दीर्घकालीन उपाययोजनांवर भर देण्याची गरज आहे. सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम करणे, इलेक्ट्रिक वाहनांसाठी पायाभूत सुविधा वाढविणे, सौरऊर्जेचा वापर प्रोत्साहित करणे आणि शहरांमध्ये सायकल ट्रॅक विकसित करणे, हे पर्यावरणपूरक पर्याय आहेत. ऊर्जा बचत ही केवळ आर्थिक नव्हे तर राष्ट्रीय जबाबदारी आहे. काटकसर ही कमकुवतपणाचे नव्हे, तर दूरदृष्टीचे लक्षण असते. देशातील सर्वोच्च नेतृत्वाने त्याची सुरुवात केली आहे. आता मंत्र्यांपासून नगरसेवकांपर्यंत प्रत्येक लोकप्रतिनिधीने या संदेशाला कृतीत उतरविले, तर इंधन बचत आणि पर्यावरण संरक्षण या दोन्ही उद्दिष्टांना नवी गती मिळू शकते.

# राष्ट्रीय डेंग्यू दिवस




केंद्र शासनाने दर वर्षीप्रमाणे राष्ट्रीय डेंग्यू दिन १६ मे २०२६ रोजी राज्यात सर्वत्र साजरा करण्याविषयी डॉ. तनु जैन संचालक (राष्ट्रीय किटक जन्य रोग नियंत्रण कार्यक्रम) भारत सरकार यांनी आदेशीत केले आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना-नुसार सर्वांना डेंग्यू विषयी जनतेमध्ये जागृती निमिर्ण होऊन प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी जनतेचा सक्रिय सहभाग करून घेण्याच्या दृष्टीने प्रत्येक वर्षी विविध उपक्रमांद्वारे नागरिकांपर्यंत माहिती पोहचविण्यासाठी १६ मे रोजी राष्ट्रीय डेंग्यू दिन साजरा करण्यात येत असतो. दरवर्षीप्रमाणे या वर्षी दि. १६ मे २०२६ रोजी राष्ट्रीय डेंग्यू दिन साजरा करण्याचे योजिले आहे.

डेंग्यू हा अतिशय गंभीर आजार आहे. दरवर्षी १६ मे हा दिवस राष्ट्रीय डेंग्यू दिवस म्हणून साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश लोकांना डेंग्यू आजाराबद्दल माहिती व जनजागरण करणे हा आहे. सन २०२६ या वर्षीचे घोष वाक्य Community Participation Dengue Control : Check, Clean and Cover आहे त्याचे मराठी भाषातंर 'डेंग्यू नियंत्रणासाठी लोकसहभाग : साठवलेल्या पाणीसाठ्यांची तपासणी करा, स्वच्छता राखा आणि ती भांडी झाकून ठेवा' असे आहे.

या वर्षीच्या घोष वाक्याप्रमाणे डेंग्यू नियंत्रणासाठी लोकसहभाग आवश्यक आहे, तसेच साठवलेल्या पाणीसाठ्यांची तपासणी करून, त्यांची स्वच्छता करावी आणि ती भांडी झाकून ठेवावी.

डॉ. संदीप सांगळे, सह संचालक, आरोग्य सेवा (हिवज) पुणे -६ यांनी दि. ११ मे २०२६ रोजी पत्र निर्गमित करून ई मेलद्वारे कळविले आहे. राज्यात राष्ट्रीय डेंग्यू दिन दि. १६ मे २०२६ रोजी साजरा करणे व जनतेमध्ये डेंग्यू आजाराविषयी जनजागृती करणे आहे. राज्य स्तरावर राज्य किटकशास्त्रज्ञ डॉ. महेंद्र जगताप, डॉ. सोमाजी अनुसे यांचे नियोजन व मार्गदर्शनानुसार जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे.

डेंग्यू आजारावर मात करावयाची असेल तर सरकारी आरोग्य यंत्रणेच्या प्रयत्नाबरोबरच जनतेचा सहभाग व ईतर सरकारी यंत्रणेचे सहकार्य तितकेच महत्वाचे आहे.

लातूर आरोग्य विभागीय स्तरावर डॉ. रेखा गायकवाड उपसंचालक आरोग्य सेवा लातूर, डॉ. संजय ढगे सहाय्यक उपसंचालक आरोग्य सेवा लातूर, डॉ. बी. एस. बरुरे सहायक संचालक आरोग्य सेवा (हिवताप) लातूर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.

नांदेड जिल्हा आरोग्य विभाग डॉ. संजय पेरके जिल्हा शल्य चिकित्सक नांदेड, डॉ. संतोष सूर्यवंशी जिल्हा आरोग्य अधिकारी नांदेड, डॉ. राजाभाऊ बुट्टे निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य) जिल्हा रुग्णालय नांदेड, डॉ. शिवशक्ती पवार, डॉ. अमृत चव्हाण जिल्हा हिवताप अधिकारी नांदेड, डॉ. प्रताप चव्हाण वैद्यकीय अधीक्षक ग्रामीण रुग्णालय भोकर यांच्या मार्गदर्शनानुसार नांदेड जिल्ह्यात व भोकर शहरात राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत वैद्यकीय अधीक्षक, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य पर्यवेक्षक, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी, आरोग्य निरीक्षक, आरोग्य कर्मचारी, आरोग्य सेविका, अंगणवाडी व आशाताई हे काम करीत आहेत व किटकजन्य आजारावर नियंत्रण ठेवत आहेत.

डेंग्यू ताप हा विशिष्ट विषाणुमुळे होतो. डेंगीचा प्रसार हा एडीस इजिप्टाय नावाच्या डासामुळे होतो. या डासाची उत्पत्ती साठवलेल्या स्वच्छ पाण्यात होते. कोणतेही पाणी ८ दिवसापेक्षा जास्त दिवस साठवून ठेवल्यास त्यामध्ये डास अंडी घालतात. त्यानंतर अंड्याचे रुपांतर डासात होते. कोणतेही साठविलेले पाणी हे आठ दिवसांपेक्षा जास्त साठवून ठेवू नये. याबाबत नागरिकांनी खबरदारी घेणे आवश्यक असून डासाची उत्पत्ती कमी करुन नियंत्रणात ठेवण्यासाठी आरोग्य यंत्रणेला जनतेचे सहकार्य आवश्यक आहे.

डेंग्यू हा अत्यंत गंभीर आजारांपैकी एक आहे. दरवर्षी लाखो लोक या आजाराने ग्रस्त आहेत. तर काही लोकांसाठी हा आजार जीवघेणाही ठरतो. विशेषतः पावसाच्या सुरुवातीच्या काळात डेंग्यूचे रुग्ण सर्वाधिक आढळतात. अशा परिस्थितीत लोकांनी डेंग्यू या आजारा बाबत जागरुकता बाळगली पाहिजे. दरवर्षी १६ मे हा दिवस राष्ट्रीय डेंग्यू दिवस म्हणून साजरा केला जातो. यामागचा इतिहास जाणून घेणं गरजेचं आहे. राष्ट्रीय डेंग्यू दिवस १६ मे हा का साजरा केला जातो, याच कारण आणि इतिहास याबद्दल थोडीशी माहिती.

### राष्ट्रीय डेंग्यू दिवसाचा इतिहास

दरवर्षी १६ मे हा राष्ट्रीय डेंग्यू दिवस म्हणून साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्यामागचा मुख्य उद्देश म्हणजे लोकांना या आजाराबद्दल जागरुक करणे आणि त्याची लक्षणे, कारणे आणि उपचारांबद्दल माहिती देणे. हा दिवस आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयातर्फे साजरा केला जातो. या आजाराबाबत लोकांमध्ये पूर्वीपेक्षा जास्त जागरुकता असली तरी ही ते या आजाराला लोक बळी पडतात. डेंग्यू या आजाराबाबत लोकांमध्ये जनजागृती व्हावी आणि त्याबाबत अचूक माहिती व्हावी यासाठी शासन स्तरावर विविध कार्यक्रम आयोजित केले जातात.

### डेंग्यू आजाराची कारणे

डेंग्यू हा डासांपासून पसरणारा रोग आहे. साचलेल्या स्वच्छ पाण्यामध्ये डेंग्यूच्या अळ्या वाढतात. डेंग्यूचा डास चावल्याने डेंग्यू होतो. जुलै ते ऑक्टोबर हे महिने डेंग्यूच्या अळ्यांच्या प्रजननासाठी अनुकूल असतात. या काळात पावसामुळे वेगवेगळ्या ठिकाणी पाणी साचण्याची शक्यता अधिक असते. अशा साचलेल्या पाण्यात डेंग्यूच्या अळ्या वाढू शकतात. डेंग्यूमध्ये अनेक प्रकारची सुरुवातीची लक्षणे दिसू शकतात.

### डेंग्यू आजाराची लक्षणे

एडीस एजिप्टाय डासाच्या संक्रमणात्मक डासाच्याचाव्यानंतरपाच-सहादिवसानंतरडेंग्युची लागण होते. डेंग्यू ताप आणि डेंग्यू रक्तस्त्रावात्मक ताप (डीएचएफ) अशा दोन प्रकारे हा आजार फैलावतो. डेंग्यू रक्तस्त्रावात्मक ताप हा एक अधिक तीव्र स्वरुपाचा आजार असून, त्यामुळे मृत्यू ओढवू शकतो. लहान मुलांमध्ये मुख्यतः सौम्य स्वरुपाचा ताप येतो. मोठ्या माणसांमध्ये अधिक तीव्रतेचा ताप सोबत डोके, डोळे दुखणे, अंगदुखी, अशक्तपणा, अंगावर लाल रंगाचा चट्टा येऊ शकतो. अंगदुखी तीव्र स्वरूपात असू शकते म्हणून याला हाडे मोडणारा ताप असेही म्हणतात. याखेरीज एकदम जोराचा ताप चढणे, डोक्याचा पुढचा भाग अतिशय दुखणे, चव आणि भूक नष्ट होणे, मळमळणे आणि उलट्या होतात. डेंगी ताप आजारात रुग्णास २ ते ७ दिवस तीव्र स्वरुपाचा ताप येतो. डोके, सांधे, स्नायु दु:खीचा त्रास होतो. रुग्णास उलट्या होतात. डोळ्याच्या आतील बाजू दुखणे, अंगावर पुरळ येणे, नाक-तोंड यातून रक्त स्त्राव होतो. अशक्यतपणा, भूक मंदावते, तोंडाला कोरड पडते ही लक्षणे दिसून आलेल्या रुग्णांनी वेळेत जवळच्या शासकीय रुग्णालयात जाऊन मोफत तपासणी व उपचार करुन घेणे आवश्यक आहे.

### डेंग्यू आजार टाळण्यासाठी उपाय

ताप असेपर्यंत आराम करा. ताप कमी होण्यासाठी 'प्रॅरासिटामॉल' गोळ्या घ्या. ताप अथवा वेदनाशामक म्हणून अस्पिरीन अथवा आयबुप्रोफेन गोळ्या घेऊ नयेत. निर्जलिकरण होऊ नये म्हणून जलपेयांचा भरपूर उपयोग करावा. (उदा. क्षार संजीवनी) रक्तस्त्राव किंवा शोकची लक्षणे असल्यास रुग्णाला ताबडतोब रुग्णालयात भरती करावे. अंग पूर्णपणे झाकणारे कपडे घालावेत मच्छरदाणी किंवा क्रीमचा वापर करावा. साठवलेले किंवा साचलेले पाणी बदलावे तसेच तुंबलेल्या गटारी वाहती करावीत तसेच खाली न करता येणाऱ्या पाणी साठ्यात, उदा. टाकी हौद यामध्ये गप्पी मासे सोडावेत.आपल्या घरी डेंग्यू ताप सर्वेक्षणसाठी येणाऱ्या आरोग्य कर्मचारी यांना सहकार्य करा व आपण अथवा इतर कोणीही आजारी असल्यास त्वरित जवळच्या प्राथमिक आरोग्य केद्रात संपर्क साधावा. डेंगी तापाची लक्षणे आढळल्यास तपासणी व उपचार सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रात, उप जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालयात व जिल्हा रुग्णालयात मोफत उपलब्ध करुन दिली आहे.

झोपतांना पूर्ण अंगभर कपडे घालावीत. पांघरन घेवून झोपावे. सायंकाळी ६ ते ८ यावेळेत दारे खिडक्या बंद कराव्यात. खिडक्यांना जाळ्या बसवाव्यात. झोपतांना चांगल्या मच्छरदाणीचा वापर करावा. आपल्या घरी किटकनाशक औषधीचे फवारणी पथक आल्यास घर संपूर्ण फवारून घ्यावे. फवारलेले घर किमान दोन ते अडीच महिने सारवून रंगरंगोटी करु नये. घराच्या छतावरील फुटके डब्बे, टाकाऊ टायर्स, कप, मडकी इत्यादींची वेळीच विल्हेवाट लावावी. शौचालयाच्या पाईपला वरच्या टोकाला जाळी किंवा पातळ कपडा नेहमी बांधावा. दर आठवडयाला नाल्यामध्ये रॉकेल किंवा टाकाऊ ऑईल टाकावे.

डेंगी तापाची लक्षणे आढळल्यास तपासणी व उपचार सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रात, उप जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालयात व जिल्हा रुग्णालयात मोफत उपलब्ध करून दिली आहे.

वरील सर्व उपाय योजनांचा अवलंब केल्यास डासामार्फत प्रसार होणारे हिव-ताप, डेंग्यू, हत्तीरोग, चिकनगुनिया, झिका, जपानी मेंदूज्वर या आजारापासून आपण मुक्त होऊन व आपल्या भावी पिढ्यांना आरोग्यदायी जीवनाचा अमूल्य ठेवा देऊ. तसेच वरील सर्व रोगाची तपासणी व उपचार सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय व जिल्हा रुग्णालयात मोफत उपलब्ध आहे.

वरील दक्षता प्रत्येकाने घेतल्यास डासाची उत्पत्ती होणार नाही व डास चावणार नाही. म्हणजे योग्य काळजी व वेळीच केलेला उपचार तुम्हाला होणाऱ्या आजारापासून दुर ठेवील त्यासाठी किटकजन्य आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्वांनी हातभार लावावा असे आवाहन नांदेड जिल्हा आरोग्य विभागाकडून डॉ. संजय पेरके जिल्हा शल्य चिकित्सक नांदेड, डॉ. संतोष सूर्यवंशी जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड, डॉ. अमृत चव्हाण जिल्हा हिवताप अधिकारी नांदेड, डॉ. प्रताप चव्हाण वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय भोकर यांनी केले आहे.

**- सत्यजीत टिप्रेसवार,**
आरोग्य निरीक्षक, ग्रामीण रुग्णालय
भोकर, जि. नांदेड.
मो. ९४२३०३०९९६

# सिंधुताई सपकाळ : अनाथांची माय

समाजात अनेक व्यक्ती जन्म घेतात; परंतु काहींचे जीवन संघर्ष, वेदना आणि मानवतेच्या तेजाने इतके उजळून निघते की ते संपूर्ण समाजासाठी प्रेरणास्थान बनते. सिंधुताई सपकाळ यांचे जीवन हे अशाच प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाचे उदाहरण आहे. एकेकाळी संसारातून हाकलली गेलेली, उपासमारीने व्याकूळ झालेली, रेल्वे स्थानकांवर भीक मागत जगणारी आणि जगण्याचा आधार हरवलेली स्त्री पुढे हजारो अनाथ मुलांची माय बनली. स्वतःच्या आयुष्यात दुःख, अपमान आणि एकटेपणाचे चटके सहन करताना त्यांनी इतरांच्या वेदना समजून घेतल्या आणि निराधार मुलांना मायेचा आधार दिला. आपल्या अश्रूंना सामर्थ्यात रूपांतरित करून त्यांनी मानवसेवेचा जो दीप प्रज्वलित केला, त्यामुळे त्या केवळ समाजसेविका राहिल्या नाहीत, तर लाखो अनाथांच्या हृदयातील आई बनल्या. त्यांचे संपूर्ण जीवन हे जिद्द, त्याग, मातृत्व आणि माणुसकीचा अद्वितीय आदर्श आहे.

सिंधुताई सपकाळ यांचा जन्म १४ नोव्हेंबर १९४८ रोजी वर्धा जिल्ह्यातील पिंपरी मेघे या गावात झाला. त्यांचे वडील अभिमन्यू साठे हे गुरे राखण्याचे काम करीत होते. अत्यंत गरिबीमुळे आणि मुलगी नको या समाजमान्य मानसिकतेमुळे त्यांचे बालपण अत्यंत कठीण परिस्थितीत गेले. त्या अवांछित मूल मानल्या गेल्यामुळे त्यांचे नाव चिंधी ठेवण्यात आले. परंतु पुढे हीच चिंधी समाजातील तुटलेल्या आणि उपेक्षित आयुष्यांना जोडणारी माय बनली. घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. शिक्षणाची आवड असूनही त्यांना चौथी इयत्तेनंतर शाळा सोडावी लागली. जंगलात लाकूडफाटा गोळा करताना किंवा शेण वेचताना मिळालेली कागदाची तुकडी त्या जपून ठेवत आणि एकट्या असताना वाचण्याचा प्रयत्न करत.

ज्ञानाची ओढ आणि जिद्द त्यांच्या स्वभावात लहानपणापासूनच होती. सिंधुताईंचा विवाह अत्यंत लहान वयात श्रीहरी सपकाळ यांच्याशी झाला. ते त्यांच्यापेक्षा वयाने खूप मोठे होते. लग्नानंतर त्यांना सासरी प्रचंड हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. गरिबी, कष्ट, अपमान आणि सासुरवास हेच त्यांचे दैनंदिन आयुष्य बनले. अठराव्या वर्षापर्यंत त्यांना तीन अपत्ये झाली होती. त्या चौथ्यांदा गर्भवती असताना त्यांच्या आयुष्यातील सर्वांत मोठा संघर्ष सुरू झाला. गावातील स्त्रियांना गुरांचे शेण काढण्याचे अत्यंत कष्टाचे काम करावे लागायचे; पण त्याबदल्यात कोणतीही मजुरी मिळत नव्हती. जंगल खात्याकडून या शेणाचा लिलाव होत असे आणि काही लोक त्यातून पैसा कमवत असत. या अन्यायाविरोधात सिंधुताईंनी आवाज उठवला. त्यांनी महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष सुरू केला. हा लढा त्यांनी जिंकला; पण त्याची फार मोठी किंमत त्यांना चुकवावी लागली. गावातील प्रभावशाली जमीनदार दमडाजी असतकर याने त्यांच्याविरुद्ध अफवा पसरवल्या. त्यांच्या चारित्र्यावर संशय घेतला गेला. त्यांच्या पतीच्या मनातही संशय निर्माण झाला आणि त्यांनी सिंधुताईंना अमानुष मारहाण करून घराबाहेर काढले.त्या वेळी सिंधुताई गर्भवती होत्या. मारहाणीत जखमी अवस्थेत त्यांनी एका गोठ्यात मुलीला जन्म दिला. सासरच नव्हे तर माहेरानेही त्यांना नाकारले. त्यानंतर त्यांचे आयुष्य अक्षरशः रस्त्यावर आले. त्या रेल्वे स्टेशनांवर भीक मागू लागल्या. परभणी, नांदेड, मनमाड अशा अनेक रेल्वे स्थानकांवर त्यांनी दिवस काढले. रात्रभर रेल्वे रुळांच्या कडेला फिरत राहून उरलेले अन्न, भाकर किंवा एखादे फळ मिळवून त्या पोट भरत असत. एकदा त्यांनी आत्महत्येचाही प्रयत्न केला; पण आपल्या लहान मुलीकडे पाहून त्यांनी तो विचार सोडून दिला.या काळातही त्यांनी मानवतेचा धागा सोडला नाही. स्टेशनवर मिळालेल्या अन्नातून त्या इतर भिकाऱ्यांनाही वाटा देत. स्वतः उपाशी राहून दुसऱ्याला खाऊ घालण्याची वृत्ती त्यांच्या स्वभावात होती



स्वतःचे दुःख सहन करत असताना सिंधुताईंना समाजातील अनाथ, बेवारस आणि निराधार मुलांचे दुःख अधिक मोठे वाटू लागले. त्यांनी ठरवले की या मुलांना आईची माया द्यायची. याच विचारातून त्यांच्या समाजकार्याची सुरुवात झाली. १९९४ मध्ये पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यात कुंभारवळण येथे त्यांनी ममता बाल सदन या संस्थेची स्थापना केली. स्वतःची मुलगी ममता हिला शिक्षणासाठी सेवासदनमध्ये ठेवून त्यांनी इतर अनाथ मुलांच्या संगोपनासाठी स्वतःला वाहून घेतले. त्यांच्या संस्थेत मुलांना अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि संस्कार दिले जातात. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी मार्गदर्शन केले जाते. अनेक मुला-मुलींचे विवाहही त्यांनी स्वतःच्या पुढाकाराने लावून दिले. हजारो मुलांचे आयुष्य त्यांनी घडवले.

सिंधुताई सपकाळ यांनी अनेक समाजोपयोगी संस्था स्थापन केल्या. त्यापैकी काही पुढीलप्रमाणे आहेत. ममता बाल सदन, सासवड बाल निकेतन, हडपसर सावित्रीबाई फुले मुलींचे वसतिगृह, चिखलदरा अभिमान बाल भवन, वर्धा गोपिका गाईरक्षण केंद्र, वर्धा सप्तसिंधू महिला आधार बालसंगोपन व शिक्षण संस्था, पुणे या संस्थांद्वारे त्यांनी हजारो निराधार मुलांना आश्रय दिला. तर सिंधुताईंनी आपल्या कार्यासाठी निधी संकलन करण्यासाठी विविध राज्ये आणि देशांचे दौरे केले. त्यांच्या प्रभावी भाषणांनी, कवितांनी आणि अनुभवकथनांनी अनेक लोक प्रेरित झाले. परदेशातून मदत मिळावी यासाठी त्यांनी मदर ग्लोबल फाउंडेशन ही संस्था स्थापन केली. त्यांचे व्यक्तिमत्त्व साधे होते; पण विचार अत्यंत मोठे होते. त्यांनी समाजाला प्रेम, माया, सेवा आणि माणुसकी यांचे महत्त्व शिकवले.सिंधुताई सपकाळ यांना त्यांच्या अतुलनीय समाजकार्याबद्दल राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सुमारे ७५० हून अधिक पुरस्कारांनी गौरविण्यात आले. त्यांच्या कार्याची दखल घेत भारत सरकारने इ. स. २०२१ मध्ये त्यांना पद्मश्री हा देशातील प्रतिष्ठेचा नागरी सन्मान प्रदान केला. इ.स. २०१२ मध्ये महाराष्ट्र शासनाने त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित केले. त्याच वर्षी पुण्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून त्यांना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुरस्कार प्रदान करण्यात आला. इ.स. २०१० मध्ये महाराष्ट्र शासनाचा अहिल्याबाई होळकर पुरस्कार त्यांना मिळाला. इ.स. २०१३ मध्ये मूर्तिमंत आई या राष्ट्रीय पुरस्काराने त्यांचा गौरव करण्यात आला. इ.स. १९९६ मध्ये आयटी प्रॉफिट ऑर्गनायझेशनतर्फे त्यांना दत्तक माता पुरस्कार देण्यात आला. याशिवाय सोलापूर येथील डॉ. निर्मलकुमार फडकुले स्मृती पुरस्कार, राजाई पुरस्कार आणि शिवलीला महिला गौरव पुरस्कार हेही त्यांना प्राप्त झाले.

इ.स. १९९२ मध्ये श्रीरामपूर येथील सुनीता कलानिकेतन न्यासतर्फे दिला जाणारा सामाजिक सहयोगी पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. इ.स. २०१२ मध्ये सीएनएन-आयबीएन आणि रिलायन्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणारा रिअल हिरो पुरस्कार त्यांना मिळाला. इ.स. २००८ मध्ये दैनिक लोकसत्तातर्फे सह्याद्रीची हिरकणी पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. इ.स. २०१५ मध्ये त्यांना प्राचार्य शिवाजीराव भोसले स्मृती पुरस्कार मिळाला, तर इ.स. २०१७ मध्ये डॉ. राम मनोहर त्रिपाठी पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच पुणे विद्यापीठाने त्यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान करून त्यांच्या कार्याला मानवंदना दिली. त्यांच्या जीवनावर आधारित मी सिंधुताई सपकाळ हा मराठी चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटात तेजस्विनी पंडित यांनी सिंधुताईंची भूमिका प्रभावीपणे साकारली. तसेच अनाथांची यशोदा हा अनुबोधपटही त्यांच्या जीवनावर तयार करण्यात आला.

२५ नोव्हेंबर २०२१ रोजी त्यांच्यावर डायफ्रामॅटिक हर्नियाची शस्त्रक्रिया करण्यात आली होती. पुढे प्रकृती खालावल्यामुळे त्यांना पुण्यातील गॅलक्सी केअर हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. ४ जानेवारी २०२२ रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांचे निधन झाले.त्यांच्या निधनाने समाजसेवेच्या क्षेत्रातील एक महान युग संपले; परंतु त्यांनी दिलेली माया, संस्कार आणि मानवतेचा संदेश आजही लाखो लोकांच्या हृदयात जिवंत आहे.

सिंधुताई सपकाळ यांचे जीवन म्हणजे दुःखावर मात करून समाजासाठी जगण्याची प्रेरणादायी गाथा होय. स्वतःच्या आयुष्यात अमानुष वेदना सहन करून त्यांनी हजारो अनाथ मुलांना जगण्याचा आधार दिला. आई या शब्दाचा खरा अर्थ त्यांनी आपल्या कार्यातून जगासमोर उभा केला. त्यांच्या जीवनातून संघर्ष, जिद्द, माणुसकी आणि निस्वार्थ सेवाभाव यांचा अमूल्य संदेश मिळतो. म्हणूनच सिंधुताई सपकाळ या केवळ समाजसेविका नव्हत्या, तर त्या खऱ्या अर्थाने अनाथांची माय होत्या.




**-डॉ. दीपाली पांडे देशमुख**
संगीत विभाग
पु. अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय,
राणी सावरगाव

# लोककवी वामनदादा कर्डक

महाराष्ट्राचे लोककवी, शाहीर, आंबेडकरी चळवळीचे बुलंद कार्यकर्ते आणि समाज प्रबोधनकार वामन तबाजी कर्डक यांची १५ मे रोजी २२ वि पुण्यतिथी होती. त्यांच्या २२ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या जीवनकार्याचा आढावा घेणारा हा विशेष लेख.



वामनदादा कर्डक यांचा जन्म १५ ऑगस्ट १९२२ रोजी नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील देशपंडी या छोट्याशा खेड्यात एका गरीब कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव तबाजी तर आईचे नाव सईबाई असे होते. त्यांना एक मोठा भाऊ आणि एक धाकटी बहीण होती. वामनदादा यांच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने त्यांना शिक्षण घेता आले नाही. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने उदरनिर्वाहासाठी दादा मिळेल ती कामे करू लागले. जत्रा यात्रांमधून कुस्ती खेळू लागले त्यातून जे पैसे मिळत त्यातून ते घरखर्च चालवू लागले. वयाच्या विसाव्या वर्षी त्यांचे लग्न झाले पण त्यांना कौटुंबिक स्वास्थ्य लाभले नाही. त्यांच्या पत्नीचे अकाली निधन झाले पुढे मुलाचेही निधन झाले. इतके मोठे दुःख उराशी बाळगून त्यांनी मुंबई गाठली.

मुंबईत त्यांनी गिरणी कामगार म्हणून काम केले. बीडीडी चाळीत त्यांचे वास्तव्य असे तिथेच त्यांची सैनिक समता दल आणि डॉ बाबासाहेब आंबेडकरांशी ओळख झाली. समता सैनिक दला-तर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सभेचेआयोजन करण्यात त्यांचा पुढाकार असायचा. वामनदादांना लहानपणापासून गायनाची आवड होती. त्यांना मिळालेली प्रतिभा ही जन्मदत्त देणगी होती. लहानपणापासून गायनाची आवड असलेल्या वामनदादांकडे लेखणी, वाणी आणि संगीत यांचा त्रिवेणी संगम होता.

एक दिवस फावल्या वेळेत ते राणीच्या बागेत बसले असताना त्यांनी एका हिंदी चित्रपट गीताचे विडंबन केले. ते गीत त्यांनी राणीच्या बागेतील गर्दीपुढे म्हटले. त्यांचे हे विडंबन गीत उपस्थित लोकांना खूप आवडले. त्यांचा आवाज आणि गाण्याचे बोल लोकांना आवडू लागले. पुढे ते आंबेडकरी जलशांमध्ये गाऊ लागले. विशेषतः ज्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण असे त्याठिकाणी बाबासाहेबांच्या भाषणाआधी वामनदादांचे गाणे होत असे. बाबासाहेबांनी त्यांच्या गाण्याची स्तुती अनेक वेळा आपल्या भाषणांमधून केली आहे.

बाबासाहेब म्हणत, माझ्या दहा भाषणांचं काम शाहिरांचं एक गाणे करते. वामनदादांचे बहुतांश गीते ही लोकगीते आहेत. वामनदादांची गीते म्हणजे कोंडलेल्या मनाचा हुंकार. वामनदादांच्या गीतांचा केंद्रबिंदू हा मानव होता, म्हणूनच वामनदादा म्हणतात माणसा इथे मी तुझे गीत गावे, तुझे गीत गावे तुझे हित व्हावे, आंबेडकर भक्ती, दलित, शोषित, स्त्रीमुक्ती, जातीव्यवस्था यावर वामनदादांनी आपल्या गीतातून प्रबोधन केले.

दादांनी आपल्या गीतातून हुंडाबळी, ऊसतोड कामगार, पर्यावरण, कामगार, शेतकऱ्यांचे प्रश्न, दुष्काळ यावरही भाष्य केले. त्यांच्या गीतांचे प्रेरणास्थान डॉ बाबासाहेब आंबेडकर हेच होते. वामन दादांनी स्वतःला भीमकार्यात वाहून घेतले. दादांनी आपल्या असंख्य लोकगीतांतून लोकांना भुरळ घातली. म्हणूनच ते लोककवी झाले. दादांनी आयुष्यभर आंबेडकरी विचारांची पताका आपल्या खांद्यावर खंबीरपणे वाहिली. आपल्या तेजस्वी लेखणीने आणि कणखर वाणीने फुले, शाहू, आंबेडकर घराघरांत पोहचवणाऱ्या या महाकवीचे १५ मे २००४ रोजी निधन झाले. लोककवी वामन दादा कर्डक यांना २२ व्या पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती समृद्ध करा -जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

▸ लालवंडी येथे पीक अवशेष व्यवस्थापन व 'सबसॉइलर' तंत्रज्ञानाचे यशस्वी प्रात्यक्षिक
▸ खरीप हंगाम पूर्व गाव मोहिमेचा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा



**नांदेड (प्रतिनिधी)**– बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर शेती अधिक शाश्वत आणि उत्पादनक्षम करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान व आधुनिक कृषी अवजारांचा वापर करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले. शेतकऱ्यांनी पारंपरिक पद्धतीसोबत आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत शेती समृद्ध करण्यावर भर द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

मौजे लालवंडी (ता. नायगाव) येथे संस्कृती संवर्धन मंडळ, कृषी विज्ञान केंद्र सगरोळी आणि हवामान अनुकूल शाश्वत विकास प्रकल्प (BCRC) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तंत्रज्ञान प्रात्यक्षिक प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, संस्कृती संवर्धन मंडळाचे चेअरमन प्रमोद देशमुख, उपविभागीय कृषी अधिकारी बी. बी. गित्ते, तालुका कृषी अधिकारी नायगाव दिपेश देवरे व कृषी विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी शेतातील पीक अवशेष व्यवस्थापनासाठी 'ट्रॅक्टरचलित श्रेडर' आणि जमिनीतील कठीण थर फोडून पाणी मुरवण्याची क्षमता वाढवण्यासाठी 'सबसॉइलर' (Sub-soiler) या यंत्रांचे प्रत्यक्ष कार्य करून दाखवण्यात आले. जिल्हाधिकारी कर्डिले यांनी तंत्रज्ञानाची पाहणी करून, जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी याचा वापर करावा, असे आवाहन केले.

प्रात्यक्षिकानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी कृषी विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या 'खरीप हंगाम पूर्व गाव मोहिमे'ला भेट दिली. यावेळी त्यांनी खालील बाबींवर विशेष भर दिला.

**बियाणे उगवण क्षमता:** पेरणीपूर्वी शेतकऱ्यांनी घरच्या घरी बियाण्यांची उगवण क्षमता तपासावी.

**बीजप्रक्रिया:** पिकांच्या संरक्षणासाठी बीजप्रक्रिया करूनच पेरणी करण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

**घरचे सोयाबीन बियाणे:** बियाण्यांवरील खर्च कमी करण्यासाठी घरचेच सोयाबीन बियाणे वापरण्याबाबत त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला.

या कार्यक्रमात कृषी विभागाच्यावतीने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत (PoCR) ग्रामस्तरावर महिला बचत गटांसाठी सुरु करण्यात आलेल्या 'कृषी अवजारे बँक' योजनेची सविस्तर माहिती देण्यात आली. महिलांनी कृषी क्षेत्रात यांत्रिकीकरणाच्या माध्यमातून पुढे यावे, यासाठी ही योजना मैलाचा दगड ठरेल, असे यावेळी सांगण्यात आले.

या कार्यक्रमास लालवंडी व परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कृषी विज्ञान केंद्राचे तज्ज्ञ आणि कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यांनी तांत्रिक मार्गदर्शन करून शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन केले.

# कुंडलवाडी येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान' शिबिरास प्रतिसाद




**कुंडलवाडी (प्रतिनिधी)** –येथे आयोजित करण्यात आलेले 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' शिबीर उत्साहात संपन्न झाले. कुंडलवाडी नगरच्या नगराध्यक्षा प्रेरणाताई कोटलावार यांच्या विशेष उपस्थितीत पार पडलेल्या या शिबिराला नागरिकांचा प्रतिसाद मिळाला.

शिबिरात मोठ्या संख्येने उपस्थित नागरिकांना विविध महसुली सेवांचा तत्काळ लाभ देण्यात आला. विविध प्रमाणपत्रांचे वितरण, महसुली तक्रारींचे निराकरण, ७/१२ उतारे, फेरफार प्रकरणे तसेच इतर सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या.

या उपक्रमामुळे नागरिकांचा वेळ वाचला असून, महसूल सेवा अधिक सुलभ आणि गतिमान करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम प्रभावी ठरत असल्याची भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली.

याप्रसंगी गजानन शिंदे तहसीलदार बिलोली, नायब तहसीलदार परळीकर संगायो विभाग, गुडूप तालुका कृषी अधिकारी बिलोली कुंडलवाडी नगरीचे उपनगराध्यक्ष शैलेश ऱ्याकावार, साईनाथ उत्तरवार, गजानन कोटलावार, प्रदीप खेळगे, मुक्तार खाजामिया, संजय गोनेलवार अमरनाथ कांबळे, सचिन कोटलावार, संतोष शिवशेट्टे, मंडळ अधिकारी श्रीमती ज्योती जिगळे, पवनजी ठकरोड, धनंजय माळेगावकर, भगवान कांबळे, शरद पाटील, राजू गाडेकर, के. जी. लांडगे सर्व ग्राम महसूल अधिकारी, धर्मेकर, अभंगे, सतिश चव्हाण पुरवठा विभाग व कृषी विभाग, आरोग्य विभाग, भूमी अभिलेख विभाग, मुंद्राक विभाग,पंचायत विभाग, नगर परिषद विभागातील यांच्यासह इतर अधिकारी व नागरिक उपस्थित होते.

# पेट्रोल दरवाढीमुळे नागरिकांच्या अडचणीत आणखी भर

## खा. रवींद्र चव्हाण यांचा केंद्र सरकारवर घणाघात



**नांदेड (प्रतिनिधी)**– पेट्रोल आणि डिझेलच्या दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांवर मोठा आर्थिक भार पडला आहे. केंद्र सरकार जनतेच्या खिशाला कात्री लावत असल्याची टीका खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी केली आहे. आधीच महागाईने होरपळणाऱ्या नागरिकांच्या अडचणीत या इंधन दरवाढी-मुळे आणखी भर पडत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलच्या दरात लिटरमागे प्रत्येकी ३ रुपयांनी वाढ केल्याच्या पार्श्वभूमीवर खा.रवींद्र चव्हाण यांनी केंद्र सरकारवर टीका केली. ते म्हणाले, केंद्र सरकार प्रत्येक वेळी आंतरराष्ट्रीय बाजारातील परिस्थितीचा आधार घेत इंधन दरवाढ करते; मात्र कच्च्या तेलाच्या किंमती कमी झाल्यानंतर सामान्य जनतेला त्याचा कोणताही फायदा दिला जात नाही. उलट अबकारी कराच्या माध्यमातून सरकार महसूल वाढवत राहते. त्यामुळे ही दरवाढ आर्थिक गरज नसून जनतेवर लादलेला अन्यायकारक भार असल्याचा आरोप त्यांनी केला.

पेट्रोल-डिझेल महाग झाल्यानंतर वाहतूक खर्च वाढतो आणि त्याचा थेट परिणाम अन्नधान्य, भाजीपाला, दूध, किराणा तसेच दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींवर होतो. त्यामुळे महागाईचा भडका उडून सर्वसामान्यांचे मासिक बजेट कोलमडून पडते. शेतकरी शेतीसाठी ट्रॅक्टर, पंप आणि वाहतुकीवर अवलंबून आहे. डिझेल दरवाढीमुळे शेतीचा उत्पादन खर्च वाढणार असून, छोटे व्यापारी आणि मालवाहतूक व्यवसाय करणाऱ्यांनाही अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागणार आहे. केंद्र सरकारने जनतेच्या हिताचा विचार न करता केवळ महसूल वाढवण्याचे धोरण स्वीकारले आहे, असेही खासदार चव्हाण यांनी म्हटले.

देशातील बेरोजगारी, वाढती महागाई आणि आर्थिक अस्थिरता यामुळे सामान्य नागरिक आधीच त्रस्त असताना इंधन दरवाढ करून सरकारने जनतेच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम केले असल्याची टीकाही त्यांनी केली. केंद्र सरकारने तातडीने इंधनावरील अबकारी कर कमी करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

# माष्टी गावात शांतता व सामाजिक सलोखा राखण्यासाठी बैठक संपन्न

**कुंडलवाडी (प्रतिनिधी)** –पोलीस स्टेशन कुंडलवाडी हद्दीतील मौजे माष्टी येथे दि. ८ मे २०२६ रोजी मराठा व दलित समाजातील काही व्यक्तींमध्ये वाद होऊन परस्पर गुन्हे दाखल झाल्याने गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर गावात शांतता व सामाजिक सलोखा कायम राहावा या उद्देशाने गुरुवार, दि. १४ मे रोजी ग्रामपंचायत कार्यालय, माष्टी येथे शांतता समिती व सामाजिक सलोखा बैठकीचे आयोजन करण्यात आले.

ही बैठक अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी सुरेखा स्वामी, धर्माबाद पंचायत समितीचे गटविकास अधिकारी क्षीरसागर, उपविभागीय पोलीस अधिकारी दशरथ पाटील, सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे तसेच पोउपनि गजेंद्र मांजरमकर यांची उपस्थिती होती.

बैठकीत गावातील दलित समाजातील २० ते २५ नागरिक तसेच मराठा समाजातील ३० ते ३५ महिला व पुरुष सहभागी झाले होते. यावेळी गावातील स्मशानभूमीचा प्रश्न, स्वच्छ व शुद्ध पिण्याच्या पाण्याची समस्या, बौद्ध विहारासाठी जागेचा प्रश्न तसेच दलित वस्तीतील पिठाच्या गिरणी संदर्भातील अडचणी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

तसेच दोन्ही गटांमध्ये दाखल गुन्ह्यांच्या अनुषंगाने कोणालाही कोणतीही अडचण निर्माण झाल्यास पोलीस प्रशासन व संबंधित प्रशासनाकडे तक्रार करण्याचे आवाहन करण्यात आले.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे विविध मागण्यांसाठी २६ रोजी उपोषण

**नांदेड (प्रतिनिधी)**–महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना माहे मार्च- २०२६ व एप्रिल- २०२६ चे निवृत्ती वेतन अद्यापही न मिळाल्या-मुळे महाराष्ट्रातील सर्व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालया-समोर २६ मे रोजी सकाळी दहा ते सायंकाळी सहा दरम्यान एकदिवसीय उपोषण करून काळ्या फिती लावून शासनाचा निषेध करण्यात येणार असल्याचे प्रसिद्धीपत्रावरून कळवले आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग आणि वित्त विभाग यांचा योग्य समन्वय नसल्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचाऱ्यांना मार्च- २०२६ व एप्रिल- २०२६ चे निवृत्तीवेतन अद्यापही जमा न झाल्यामुळे १३ हजार सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये सरकारच्या विरोधात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. सरकारकडे अनेक वेळा पत्रव्यवहार केले, परंतु त्यांच्या पत्राची अद्याप दखल घेतली गेली नाही. ७०, ८० आणि ९० वर्ष झालेले ज्येष्ठ सेवानिवृत्त कर्मचारी विविध आजाराने त्रस्त झालेले आहेत. औषधोपचाराकरिता निवृत्तीवेतनाची नितांत आवश्यकता आहे. तसेच निवृत्तीवेतनधारक महिला यांची उपजीविका निवृत्तीवेतनावरच अवलंबून आहे. मार्च २०२६ पासून आजपर्यंत राज्यातील सात ते आठ सेवानिवृत्त कर्मचार्यांचे निवृत्त वेतनाची वाट पाहता पाहता निधन झाले आहे. प्रलंबित निवृत्ती वेतन तत्काळ देण्याच्या मागणीसाठी आंदोलन करण्यात येणार असल्याचे कळविण्यात आले आहे.

# निरामय नंदीग्राम : मुख्यमंत्री सहायता निधीच्या पुढाकारातून नांदेडमध्ये ग्रामस्तरापर्यंत सर्वंकष आरोग्य सेवेचा आराखडा

**नांदेड (प्रतिनिधी)**– ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा गावपातळीवर उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, महाराष्ट्र शासन यांच्या पुढाकारातून निरामय नंदीग्राम (नांदेड) या व्यापक आरोग्य अभियानाचा आराखडा तयार करण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून तसेच मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली या अभियानाच्या प्राथमिक नियोजन बैठकीचे आयोजन मुख्यमंत्री सहायता कक्षाचे प्रशासकीय वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वानंद अरुण सोनार यांच्या अध्यक्षतेखाली नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे करण्यात आले होते.

या बैठकीत शासनाचे विविध विभाग, राष्ट्रीयकृत व खासगी बँका, CSR दाते उद्योगसमूह, सेवाभावी संस्था, वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ तसेच खासगी रुग्णालयांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. ग्रामीण भागातील वंचित घटकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्यासाठी सार्वजनिक-खासगी भागीदारीच्या माध्यमातून व्यापक यंत्रणा उभारण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे प्रशासकीय वैद्यकीय अधिकारी (वर्ग-१) डॉ. स्वानंद सोनार यांनी बैठकीत बोलताना, आरोग्य सेवा केवळ शहरांपुरती मर्यादित न राहता ती ग्रामीण व तळागाळातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचली पाहिजे. शासनाच्या विविध आरोग्य योजनांचा लाभ प्रत्येक गरजू व्यक्तीपर्यंत पोहोचवण्यासाठी शासन, सामाजिक संस्था, CSR दाते, सार्वजनिक बँका आणि खासगी रुग्णालयांनी समन्वयाने कार्य करणे अत्यावश्यक आहे, असे मत व्यक्त केले.

या बैठकीस जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, महानगरपालिका आरोग्य अधिकारी डॉ. हनमंत रिठ्ठे, मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे माहिती तंत्रज्ञान समन्वयक युवराज महाजन, डॉ. चंद्रकांत मुंडे, वैद्यकीय अधिकारी मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड, समाजसेवा अधीक्षक गजानन वानखेडे, समन्वयक संभाजी लोंढे आणि महसूल सहाय्यक नारायण वाडेकर आदी उपस्थित होते.

बैठकीस स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI), बँक ऑफ महाराष्ट्र, युनियन बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, ICICI बँक, HDFC बँक, IDBI बँक, इंडियन बँक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, UCO बँक आणि नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे प्रतिनिधी उपस्थित होते. याशिवाय गोदावरी ड्रग्स, वेंकीज इंडिया प्रा. लि. तसेच MIDC नांदेडमधील विविध उद्योगसमूह आणि उद्योजक तसेच मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाशी संलग्न नांदेड जिल्ह्यातील विविध खासगी रुग्णालयांचे प्रतिनिधी, डॉक्टर्स आणि सामाजिक संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षामार्फत राबविण्यात आलेल्या विविध आरोग्य उपक्रमांचा आढावा सादर करण्यात आला. गेल्या चौदा महिन्यांत चरणसेवा, नमो नेत्र संजीवनी, आरोग्याचा श्री गणेशा, एक हात मदतीचा आणि हिंद दी चादर यांसारख्या विविध आरोग्य मोहिमा आणि समुदाय आरोग्य शिबिराची एकंदरीत कार्यप्रणाली, लाभार्थी रुग्णसंख्या व लोकसहभागातून उभारण्यात आलेल्या निधी बाबत इत्यंभूत माहिती उपस्थितांना देण्यात आली.

या शिबिरांत संदर्भित रुग्णांना द्वितीय तथा तृतीयस्तरीय चिकित्सा सेवाकरीता मुख्यमंत्री सहायता निधीतून भरघोस मदत उपलब्ध करून देण्यात आलेली असून प्राथमिक सर्वेक्षण, प्रारंभिक तपासणी व औषोधोपचार व निदानात्मक सेवांकरीता मात्र शासनाचा कोणताही थेट निधी न वापरता सार्वजनिक-खासगी भागीदारी (PPP मॉडेल) करण्यात आला व हे उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आले. या मोहिमांमुळे ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना वैद्यकीय मदत, शस्त्रक्रिया, तपासण्या, मोफत औषधोपचार आणि उपचारासाठी आवश्यक सहाय्य उपलब्ध झाले आहे.

बैठकीत नांदेड जिल्ह्यात महिलांमधील कर्करोग, निमिया, असंसर्गजन्य आजार (NCD), दूषित पाण्यामुळे होणारे आजार, त्वचारोग, COPD आणि व्यवसायजन्य आजारांचे प्रमाण वाढत असल्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली. तसेच त्याची कारणे, प्रतिबंधात्मक उपाययोजना व अपेक्षित उपचारात्मक सुविधा यावर विचार मंथन करण्यात आले.

या पार्श्वभूमीवर ग्रामपातळीवर व्यापक आरोग्य सर्वेक्षण, निदानात्मक आरोग्य शिबिरे, कर्करोग तपासणी मोहिमा, महिला आरोग्य जनजागृती आणि वेळेवर उपचारासाठी प्रभावी संदर्भ प्रणाली उभारण्यावर भर देण्यात आला.

बैठकीत उपस्थित उडठ दाते, उद्योगसमूह आणि खासगी बँकांना आरोग्यविषयक उपक्रमांसाठी आर्थिक सहाय्य, वैद्यकीय साहित्य, औषधे आणि आवश्यक उपकरणे उपलब्ध करून देण्याचे आवाहन करण्यात आले. ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा सक्षम करण्यासाठी सार्वजनिक-खासगी भागीदारी प्रभावीपणे राबविण्याचे नियोजन यावेळी मांडण्यात आले.

# सोयाबीन, तूर, मूग, उडीद, ज्वारी प्रमाणित बियाणे वाटपासाठी शेतकऱ्यांनी अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)**– खरीप हंगाम २०२६ मध्ये विविध योजनांतर्गत प्रमाणित बियाणे वितरणासाठी महाडीबीटी प्रणालीवर अर्ज प्रक्रिया सुरू आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान अंतर्गत तूर, मूग, उडीद, ज्वारी या योजनेत १० वर्षांच्या आतील किंवा वरील अधिसूचित वाणांसाठी अर्ज करता येणार आहे.

राष्ट्रीय खाद्यतेल अभिया-नातील तेलबिया योजनेत सोयाबीन ५ वर्षांच्या आतील अधिसूचित वाणांसाठी अर्ज करता येणार आहे. लाभार्थी निवड प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर होणार आहे. प्रमाणित बियाणे वितरणासाठी सोयाबीन, तूर, मूग, उडीद, ज्वारी या पिकांसाठी वैयक्तिक शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक फार्मर आयडीद्वारे महाडीबीटी पोर्टलवर बियाण्यांसाठी अर्ज करावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

शेतकऱ्यांना अर्ज करण्यासाठी (https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/ griLogin) या संकेतस्थळाचा वापर करावा. योजनेबाबत अधिक माहितीसाठी कृषी विभाग, महाराष्ट्र राज्याचे www.krishi.maharashtra.gov.in संकेतस्थळ पाहावे. संबंधित कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अटी व शर्ती अर्जदार शेतकऱ्यांना बंधनकारक राहतील असेही कृषी विभागाने कळविले आहे.



**नांदेड** : छावा क्रिकेट क्लब नांदेड आयोजित गुरूगोविंदसिंघ स्टेडीयम येथे खेळविण्यात येत असलेल्या लेदर बॉल टूर्नामेंट लीग मॅचेसचा शुभारंभ आ. बालाजीराव कल्याणकर यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी सुनील राणे, उमेश माळगे, क्रिकेट क्लबचे कर्णधार बालाजी सूर्यवंशी, मुंजाजी चौरे, धनराज बिरादार, विठ्ठल रेड्डी, शिवा भाटापूरकर, बंटी बुक्तरे, ओमी राठोड, निखील काकडे, गजानन पायनामल्ले, सतीश राठोड, पांडूरंग काकडे, मुस्तफा आदी उपस्थित होते.
(छाया : ज्ञानेश्वर सुनेगावकर)

# महाराजस्व शिबिराच्या माध्यमातून प्रशासन सामान्य माणसापर्यंत पोहोचतेय -डॉ. सचिन खल्लाळ

## वसरणी येथील महाराजस्व शिबिरात १४७४ प्रमाणपत्रांचे वाटप



**नांदेड (प्रतिनिधी)**– छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराच्या माध्यमातून प्रशासन सामान्य माणसापर्यंत पोहोचत आहे. जनतेच्या समस्या जाणून घेऊन त्याचे निराकरण करण्यात येत आहे, असे मत नांदेडचे उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांनी व्यक्त केले. वसरणी महसूल मंडळ अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धनेगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर गुरुवार, दि. १४ मे रोजी आयोजित करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

या शिबिरात ८७१ सातबारा, ५९१ आठ अ चे उतारे तसेच संजय गांधी निराधार योजनेचे बारा लाभार्थी असे एकूण १४७५ तर इतर विभागाकडून अनेक लाभार्थ्यांना लाभाचे कार्ड वितरित करण्यात आले.

डॉ. सचिन खल्लाळ म्हणाले की, महाराजस्व समाधान शिबिराच्या माध्यमातून नांदेड तालुक्यात जवळपास १० हजार लोकांपर्यंत पोहोचलो आहोत. लोकांच्या समस्या जाणून घेऊन त्याचे निराकरण करण्यात प्रशासन यशस्वी होत आहे, असे ते यावेळी म्हणाले. यावेळी तहसीलदार संजय वारकड, नायब तहसीलदार महसूल सुनील माचेवाड, स्वप्नील दिघलवार, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण मुंडे, वैद्यकीय अधिकारी तुप्पा गुडपे, मंडळ कृषी अधिकारी सुनील सानप, धनेगावचे सरपंच पिंटू पाटील शिंदे आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविकात नांदेडचे तहसीलदार संजय वारकड यांनी शासनाच्या सर्व योजनांचा लाभ एकाच ठिकाणी मिळावा, हा या शिबिराचा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले. तसेच आतापर्यंत २२ हजार लोकांना विविध प्रमाणपत्र दिली असल्याचे ते म्हणाले. त्यांनी उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी विविध विभागाचे स्टॉल लावण्यात आले होते. त्यात प्रामुख्याने महसूल विभाग, निवडणूक विभाग, विशेष सहाय्य विभाग, आरोग्य विभाग, कृषी विभाग, भूमी अभिलेख, नोंदणी विभाग, महावितरण, आधार केंद्र, आपले सरकार केंद्र, अनुलोम संस्था आदींचे स्टॉल लावण्यात आले होते. शिबीर यशस्वी करण्यासाठी वसरणी मंडळाचे मंडळ अधिकारी सय्यद मोहसिन, ग्राम महसूल अधिकारी आर. पी. मुंडे, संजय वानोळे, दीपक सोनटक्के आदींनी परिश्रम घेतले. यावेळी मंडळ अधिकारी प्रमोद बडवणे, संतोष अस्कुळकर, श्रीकृष्ण येलमटे, ग्राम महसूल अधिकारी रमेश गिरी, मनोज सरपे, मारुती जमदाडे, श्रीरामे यावेळी उपस्थित होते. तसेच विशेष सहाय्य विभागाचे श्रीमती प्रीतिका मुडगुलवार, संतोष वाघमारे, बालाजी सोनटक्के, गणेश वाघमारे, प्रतीक्षा गायकवाड आदी उपस्थित होते. आधार व सेतू केंद्राचे विजय जोंधळे, नागनाथ स्वामी, राजश्री मिरजकर तसेच अनुलोम सामाजिक संस्थेचे राम मुलांगे, पूजा गोडघासे, सुषमा शिंदे, दिपाली भुसेवार आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आकाशवाणी नांदेड केंद्राच्या निवेदिका राजश्री मिरजकर यांनी तर आभार मंडळ अधिकारी सय्यद मोहसिन यांनी मानले.

# अंतर्मन

# ऑफिस डेस्कवर या वस्तू ठेवणे नाही शुभ !

## कोण कोणत्या वस्तू प्रगतीचा मार्ग मोकळा करतात, जाणून घ्या...

**ऑफिस डेस्कवर ठेवलेल्या काही वस्तू नोकरी आणि प्रगतीमध्ये अडथळ्यांचे कारण ठरू शकतात. कारण लोक दिवसातून अंदाजे ८-९ तास त्यांच्या ऑफिसच्या टेबलवर काम करतात. त्यामुळे तिथे असलेल्या वस्तूंचा व्यक्तीच्या जीवनावरही परिणाम होतो. वास्तुशास्त्रानुसार, काही वस्तू अशा आहेत ज्या तुमच्या ऑफिसच्या डेस्कवर कधीही ठेवू नयेत. या वस्तूंमुळे नकारात्मकता निर्माण होऊ शकते आणि संधींमध्ये अडथळा येऊ शकतो. तथापि तुम्ही तुमच्या डेस्कवर काही शुभ वस्तू ठेवू शकता. याव्यतिरिक्त, तुम्ही डेस्कशी संबंधित वास्तु तत्त्वे देखील लक्षात ठेवली पाहिजेत. चला, ऑफिस डेस्कसाठीच्या या वास्तु टिप्स सविस्तरपणे जाणून घेऊया...**

### या वस्तू डेस्कवर ठेवू नका...



» वास्तुशास्त्रानुसार, तुम्ही तुमच्या ऑफिसच्या डेस्कवर जेवणाची ताटे कधीही ठेवू नयेत. असे केल्याने तुमच्या मानसिक स्पष्टतेवर परिणाम होतो, ज्यामुळे निर्णय घेण्यात अडचणी येतात.

» जर तुमच्या ऑफिसच्या डेस्कवर निवडुंगासारखी काटेरी झाडे असतील, तर ती ताबडतोब काढून टाका. वास्तुशास्त्रानुसार, या प्रकारची झाडे नकारात्मक ऊर्जा आकर्षित करतात, ज्यामुळे सभोवतालची नकारात्मकता वाढते.

» ज्या फाईल्स, कागदपत्रे किंवा वायर्स तुम्हाला गरज नाही, त्या तुमच्या ऑफिसच्या डेस्कवर ठेवू नका. अशा वस्तू डेस्कवर ठेवल्याने तुमच्या कामगिरीवर परिणाम होऊ शकतो.

» तुमच्या ऑफिसच्या डेस्कचा मध्यभाग नेहमी पूर्णपणे रिकामा ठेवावा. तिथे कोणत्याही प्रकारच्या वस्तू ठेवणे योग्य मानले जात नाही.

### डेस्कवर या वस्तू ठेवणे शुभ

» तुमच्या सभोवताली सकारात्मक वातावरण राखण्यासाठी, तुम्ही वास्तूनुसार तुमच्या डेस्कवर काही वस्तू ठेवू शकता. तुम्ही तुमच्या ऑफिसच्या डेस्कवर कासव ठेवू शकता, जे वास्तूनुसार खूप शुभ मानले जाते.

» तुमच्या ऑफिसच्या डेस्कवर हत्तीचा छोटा पुतळा ठेवणे देखील खूप शुभ मानले जाते. यामुळे करिअरमध्ये प्रगती होण्यास मदत होते आणि एकाग्रता वाढते.

» तुम्ही तुमचा संगणक किंवा लॅपटॉप तुमच्या ऑफिसच्या टेबलाच्या दक्षिण कोपऱ्यात ठेवू शकता. तुम्ही डेस्कवर सकारात्मकता वाढवणारी छोटी रोपे देखील ठेवू शकता.



### डेस्कसाठी वास्तू टिप्स

» वास्तुशास्त्रानुसार, तुमचा ऑफिस डेस्क नेहमी स्वच्छ आणि व्यवस्थित असावा. त्याच्या आजूबाजूला वस्तूंची गर्दी करणे शुभ मानले जात नाही.

» शक्य असल्यास, सर्वोत्तम परिणामांसाठी, ऑफिस डेस्क किंवा टेबल नेहमी नैऋत्य दिशेला ठेवावे. जर तुम्ही तुमचे ऑफिस डेस्क या ठिकाणी ठेवू शकत नसाल, तर ते पश्चिम भिंतीकडे तोंड करून ठेवा.

» वास्तुशास्त्रानुसार, 'L' आकाराचे ऑफिस डेस्क अशुभ मानले जाते. तसेच, बीमखाली डेस्क ठेवणे अशुभ मानले जाते.

» ऑफिस डेस्कच्या मागे लाकडी भिंत नसावी. तसेच, तिथे दरवाजा किंवा खिडकीही नसावी.

» वास्तुशास्त्रानुसार, आयताकृती किंवा चौरस ऑफिस टेबल शुभ मानले जाते.

# वट सावित्री पूजा; संपूर्ण यादी घ्या लक्षात!; 'या' 4 गोष्टींशिवाय पूजा अपूर्ण...



**हिंदू धर्मात वट सावित्री व्रताला विशेष महत्त्व आहे. वट सावित्रीचा उपवास ज्येष्ठ महिन्याच्या अमावस्येच्या दिवशी केला जातो. या दिवशी विवाहित स्त्रिया व्रत करतात आणि आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी व अखंड सुदैवासाठी प्रार्थना करत वटवृक्षाची पूजा करतात. वट सावित्रीच्या दिवशी वटवृक्षाची आणि सावित्री देवीची पूजा करणे विशेष महत्त्वाचे मानले जाते. असे केल्याने सुदैव आणि सुखी वैवाहिक जीवन लाभते, असा विश्वास आहे. पंचांगानुसार, या वर्षी वट सावित्रीचे व्रत शनिवार, १६ मे रोजी केले जाईल. व्रतासाठी सर्व आवश्यक साहित्य असणे महत्त्वाचे आहे, कारण काही वस्तूंशिवाय व्रत अपूर्ण मानले जाते. चला वट सावित्री उपवासासाठी लागणाऱ्या साहित्याची यादी सविस्तरपणे पाहूया...**



ज्येष्ठ अमावस्येच्या दिवशी विवाहित महिला सकाळी लवकर उठून स्नान करतात आणि त्यानंतर वट सावित्री व्रत पाळण्याचा संकल्प करतात. यानंतर, विधीनुसार सावित्री देवी आणि वटवृक्षाची पूजा केली जाते. जर तुमच्या घराजवळ वटवृक्ष नसेल, तर कुठूनतरी वटवृक्षाची फांदी आणून तिची पूजा करता येते. सावित्री देवी आणि वटवृक्षाच्या पूजेसाठी आवश्यक साहित्य असे : गंगाजल, तांब्याचे भांडे, कुंकू, लाल-पिवळा दौरा, अक्षता, सुती धागा, तूप, दीवा, वाती, अगरबत्ती, तीळ, आंबा, भिजवलेली हरबरा दाळ, मोसमी फळे, लाल आणि पिवळी फुले, मिठाई, केळीची पाने, मातीची भांडी, नवीन कपडे, मेकअपचे साहित्य. वटसावित्री पूजेसाठी वडाचे झाड, सुती धागा, हातपंखा आणि हरबरा दाळ असणे विशेष महत्त्वाचे आहे. या चार गोष्टींशिवाय पूजा अपूर्ण मानली जाते. म्हणून, तुमच्या पूजेत त्यांचा नक्की समावेश करा.

### वट सावित्री व्रताचे महत्त्व

या दिवशी विवाहित स्त्रिया आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी सोळा अलंकारांनी स्वतःला सजवतात आणि वट सावित्री व्रत करतात. श्रद्धा आणि पौराणिक कथेनुसार, सावित्री देवीच्या पुण्यकर्मांनी प्रसन्न होऊन यमराजाने तिचा पती सत्यवान याला पुन्हा जिवंत केले. हे घडण्यापूर्वी सत्यवानाचे शरीर वटवृक्षाखाली होते. म्हणूनच विवाहित स्त्रिया या दिवशी सावित्री देवीसोबत वटवृक्षाची पूजा करतात. असे मानले जाते की ब्रह्मा, विष्णू आणि महेश हे तीन देव वटवृक्षात वास करतात. त्यामुळे त्याच्याखाली बसून, त्याची पूजा करून आणि त्याला प्रदक्षिणा घालून इच्छा पूर्ण होऊ शकतात. यावर्षी वट सावित्री व्रत शनि जयंती आणि शनि अमावस्येच्या दिवशी येत आहे, ज्यामुळे ही तारीख आणखी विशेष ठरते.



# तुम्हीसुद्धा जुन्या वस्तू विकत घेता का?

## घरी आणण्यापूर्वी हे 6 वास्तू नियम जाणून घ्या...

**वास्तूशास्त्रानुसार, जुन्या वस्तू किंवा फर्निचर आपल्यासोबत जुन्या घराची आणि त्या वापरणाऱ्या व्यक्तीची ऊर्जा आणि आठवणी घेऊन येतात. याचा परिणाम तुमच्या घराच्या वातावरणावर तसेच तुमच्या जीवनावर होतो. अशा परिस्थितीत काही महत्त्वाच्या वास्तू टिप्स उपयुक्त ठरू शकतात...**



» वास्तूशास्त्रानुसार जुन्या वस्तू घरी आणल्याने नकारात्मक ऊर्जा निर्माण होऊ शकते. दुसऱ्या कोणीतरी वापरलेल्या वस्तूंमुळेही घरात समस्या निर्माण होऊ शकतात. पैसे वाचवण्यासाठी अनेक लोक जुन्या वस्तू विकत घेतात, पण त्या वापरणारी व्यक्ती अजून जिवंत आहे की नाही हे त्यांना माहीत नसते. वास्तुशास्त्रानुसार मृत व्यक्तीच्या जुन्या वस्तूंमध्ये त्यांची ऊर्जा, भावना आणि आठवणी असतात, ज्यांचा तुमच्यावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे, त्या व्यक्तीची भावनिक ऊर्जा काढून टाकणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जुन्या वस्तू खरेदी करणे चुकीचे नाही, परंतु त्या वापरण्यापूर्वी काही महत्त्वाच्या वास्तु नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

» मिठाने स्वच्छता : जर तुम्ही मृत व्यक्तीचे कपाट किंवा फर्निचर वापरणार असाल, तर ते पूर्णपणे स्वच्छ करणे महत्त्वाचे आहे. पाणी आणि सैंधव मिठाच्या द्रावणाने ते पूर्णपणे स्वच्छ करा. मीठ जुन्या आणि त्रासदायक आठवणी शोषून घेण्यास मदत करते.

» सूर्यप्रकाश : सूर्यप्रकाश हा सर्वात शक्तिशाली शुद्धिकारक मानला जातो. त्यामुळे, जुन्या वस्तू किमान एक दिवस प्रखर सूर्यप्रकाशात ठेवा. सूर्याची तेजस्वी किरणे वस्तूमधील जुनी आणि नकारात्मक ऊर्जा पूर्णपणे नष्ट करतील आणि ती सकारात्मक ऊर्जेने भरतील.

» गंगाजल शिंपडणे : हिंदू धर्म आणि वास्तुशास्त्र या दोन्हीमध्ये गंगाजल अत्यंत शुद्ध आणि पवित्र मानले जाते. नकारात्मक ऊर्जा नष्ट करण्याची अद्भुत शक्ती त्यात आहे. त्यामुळे, गंगाजल शिंपडल्याने त्या वस्तूवरील पूर्वीच्या मालकाच्या दुःखाचा आणि तणावाचा प्रभाव पूर्णपणे नाहीसा होतो.

### वास्तु गुरूंचा सल्ला

उपाय करत असताना, मनातल्या मनात प्रार्थना करा, मी या वस्तूला जुन्या, वेदनादायी आठवणींपासून मुक्त करतो आणि नव्या प्रेमाने व शांतीने तिचा स्वीकार करतो.

» कापूर आणि लोबानचा वापर : कापूर आणि लोबान घरातील नकारात्मक ऊर्जा दूर करण्याचे काम करतात. त्यामुळे, जुन्या वस्तूंजवळ भीमसेनी कापूर किंवा लोबान जाळा. त्याचा धूर साचलेली ऊर्जा दूर करण्यास आणि सकारात्मक ऊर्जा वाढविण्यात मदत करतो. तिथे अगरबत्तीसुद्धा लावता येते.

» जुने फर्निचर रंगवणे : घरांमध्ये प्रार्थनेच्या वेळी घंटा वाजवण्याची प्रथा आहे. घंटेचा आवाज नकारात्मक ऊर्जा तोडण्यास मदत करतो. त्याचे कंपन तेथील नकारात्मक ऊर्जा नष्ट करते. शक्य असल्यास, जुने फर्निचर आणि वस्तू पुन्हा रंगवा. नवीन रंग वस्तूला नवीन ओळख देण्यास मदत करतो आणि जुनी ऊर्जा नाहीशी करतो.

### आत्मजागर...

# काही आपले नव्हते, ना आपले राहणार, सर्व इथेच सोडून जावे लागणार, जग आहे अतिथीगृह...

**हे जग एक अतिथीगृह आहे, जिथे आपण सर्वजण काही काळासाठी राहतो. या लेखाचा उद्देश वाचकांना आत्मपरीक्षण करण्यास, जीवनाचा खरा उद्देश समजून घेण्यास आणि जन्म-मृत्यूच्या चक्रातून कायमचे मुक्त होण्याच्या अंतिम ध्येयाकडे, म्हणजेच मोक्षप्राप्तीसाठी, योग्य दिशेने वाटचाल करण्यास प्रेरित करणे हा आहे.**

जेव्हा एखादी व्यक्ती हे नश्वर जग सोडून जाते, तेव्हा तिच्या मनात एकच विचार येतो की, नऊ महिने लागून तयार झालेले शरीर एका क्षणात कसे नष्ट होते. तुम्ही या जगात काय आणले आणि काय सोबत घेऊन जाणार? झोपलेल्या जागा हो, हे जग एक अतिथीगृह आहे... या ओळी जीवनातील कठोर सत्य उघड करतात. जेव्हा मनुष्य या जगात जन्माला येतो, तेव्हा तो आपल्यासोबत काहीही आणत नाही, ना संपत्ती, ना पद, ना प्रतिष्ठा. जेव्हा तो निघून जातो, तेव्हा तो सर्व काही मागे सोडून जातो. तरीही आयुष्यभर तो या तात्पुरत्या गोष्टींचा पाठलाग करत राहतो. असे का होते? यावर चिंतन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हे जग खरे तर एक असे ठिकाण आहे, जिथे आपण काही काळ राहतो. ज्याप्रमाणे एखादा प्रवासी हॉटेल किंवा धर्मशाळेत थांबतो, विश्रांती घेतो आणि मग पुढे जातो, त्याचप्रमाणे मनुष्य या जगात येतो, काही काळ घालवतो आणि मग निघून जातो. परंतु जेव्हा एखादी व्यक्ती या तात्पुरत्या निवासस्थानालाच आपले कायमचे घर मानते, तेव्हा जीवनात दुःख आणि समस्या निर्माण होतात. भ्रमाच्या प्रभावाखाली, मनुष्य संपत्ती, मालमत्ता आणि भौतिक सुखांनाच जीवनाचा एकमेव उद्देश मानतो. हे सर्व केवळ तात्पुरते आहे, हे तो विसरतो. मृत्यूनंतर, त्याची संपत्ती किंवा त्याचा अहंकार त्याच्यासोबत राहणार नाही. केवळ त्यांची कर्मे, चांगली असोत वा वाईट, त्यांच्यासोबत राहतील. आत्मज्ञान आणि सत्कर्मे हीच खरी संपत्ती आहे, जी हे जग आणि परलोक दोन्ही सुधारते. माणसांनी हे गहन सत्य समजून घेणे आणि त्याबद्दल जागरूक होणे अत्यावश्यक आहे. 'झोपलेल्या, जागे हो' याचा अर्थ केवळ झोपेतून जागे होणे नव्हे, तर अज्ञानातून ज्ञानाकडे जाणे आहे. ज्योतिषशास्त्राचे ज्ञान देखील व्यक्तीला अंधारातून प्रकाशाकडे नेते. भौतिक जगात यश मिळवण्यासाठी आणि परलोक सुधारण्यासाठी ज्योतिषशास्त्राचे ज्ञान अत्यंत उपयुक्त आहे.

# कुंडलीत राजयोग जास्त की कष्टयोग?, शुभ-अशुभ योगांबद्दल जाणून घ्या...

**जर कुंडलीत शुभ योगांची संख्या जास्त असेल, तर व्यक्ती जीवनात मान, संपत्ती आणि इतर गोष्टी यशस्वीपणे प्राप्त करते. जर कुंडलीत अशुभ योगांची संख्या शुभ योगांच्या संख्येपेक्षा जास्त असेल, तर व्यक्तीला दुर्दैवाच्या जाळ्यात अडकवतात...**




अशुभ ग्रहयोगांमध्ये अडकलेली व्यक्ती कठोर परिश्रम करूनही प्रगती आणि उन्नतीपासून वंचित राहते. बहुतेक लोक राजयोगाला केवळ असा योग समजतात जो सरकारकडून लाभ आणि अधिकार प्रदान करतो. वास्तविक पाहता राजयोग कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही क्षेत्रात यश मिळवून देऊ शकतो. प्रत्येक राजयोग व्यक्तीला राजसत्तेशी जोडेलच असे नाही. शुभ राजयोगांचे अनेक प्रकार आहेत, राजयोग, नीचभंग राजयोग आणि विपरीत राजयोग, म्हणजेच कुंडलीत तयार झालेले असे योग जे प्रतिकूल परिस्थितीनंतर शुभ फळे देतात. पंचमहापुरुष योग हा अतिविशिष्ट राजयोग आहे. अशुभ योगांमध्ये सर्वाधिक प्रचलित कालसर्प योग, केमद्रुम योग आहेत. चंद्राद्वारे तयार होणाऱ्या अनफा-सुनफा योगांनाही विशेष महत्त्व आहे.

» सुनफा योग : जर कुंडलीत चंद्रापासून दुसऱ्या घरात सूर्याव्यतिरिक्त कोणताही ग्रह असेल, तर सुनफा योग तयार होतो. महर्षी पाराशरांच्या मते, या योगात जन्मलेली व्यक्ती राजा किंवा राजासारखी असेल, तिच्याकडे स्व-अर्जित संपत्ती असेल, ती तिच्या बौद्धिक क्षमतेसाठी आदरणीय आणि प्रसिद्ध असेल, तसेच ती श्रीमंत आणि प्रतिष्ठित असेल.

» अनफा योग : जर चंद्रापासून बाराव्या घरात सूर्याव्यतिरिक्त कोणताही ग्रह असेल, तर अनफा योग तयार होतो. महर्षी पाराशरांच्या मते, अनफा योगात जन्मलेली व्यक्ती राजा, रोगमुक्त, सद्गुणी, प्रसिद्ध, आकर्षक आणि आनंदी असेल.

» ज्याप्रमाणे चंद्र सुनफा, अनफा आणि केमद्रुम योग निर्माण करतो, त्याचप्रमाणे सूर्यदेखील वेसी, वासी, उभयाचारी आणि बुध आदित्य योग निर्माण करतो, ज्यांच्याबद्दल जाणून घेणे देखील खूप महत्त्वाचे आहे.

# संत्री आयात ड्युटी रिफंड योजना बंद; सरकारचे शेतकऱ्यांसाठी नवे निर्णय

**मुंबई (प्रतिनिधी)** – महाराष्ट्र सरकारने शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्यांचे उत्पादन आणि धरणांमधील टाकाऊ पदार्थ यापुढे वाया जाऊ दिले जाणार नाहीत. यासाठी एक सुधारित धोरण सादर करण्यात आले आहे. राज्यातील सहा प्रमुख प्रकल्पांमधून प्रायोगिक तत्त्वावर गाळ आणि वाळू काढण्यात येईल. यामुळे धरणांमधील पाणीसाठा वाढेल आणि कचऱ्याचा योग्य वापर करणेही शक्य होईल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत पाणीसाठा, संत्र्यांवरील आयात शुल्क परतावा योजना रद्द करणे, वैद्यकीय शिक्षण संस्थांच्या इमारतींना ५० टक्के सूट यासह १३ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. मंत्रिमंडळाच्या बैठकीत संत्र्यांवरील आयात शुल्क परतावा योजना रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. बांगलादेशला निर्यात होणाऱ्या संत्र्यांवर आयात शुल्कात ५० टक्के अनुदान मिळत होते.

या योजनेचा राज्यातील शेतकऱ्यांना फायदा होत नसल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला. ठरल्याप्रमाणे, सिंचन प्रकल्पांच्या जलाशयांमधून गाळ आणि गाळमिश्रित वाळू काढण्यासाठी सुधारित धोरण लागू केले जाईल. यामुळे जलसाठा वाढेल, शेतकऱ्यांना मुबलक गाळ मिळेल आणि धरणांचे संरक्षण होईल. नाशिक जिल्ह्यातील आंबोली-वेलुंज ओढा वळवण प्रकल्पाला ४९.२६ कोटी रुपयांची मंजुरी देण्यात आली आहे.पुढील तीन वर्षांसाठी कोकणातील सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये सिंधुरत्न समृद्धी योजना २.० राबविण्यात येईल. खाजगी अनुदानित निवासी उच्च माध्यमिक आश्रम शाळांमधील शिक्षकांना १२ आणि २४ वर्षांच्या नियमित सेवेनंतर चट्टोपाध्याय आयोगानुसार वरिष्ठ वेतनश्रेणी आणि निवडश्रेणी लागू करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. नाशिकच्या कुसुमाग्रज प्रतिष्ठानला शैक्षणिक वर्षापासून दरवर्षी १० लाख रुपयांच्या अनुदान योजनेअंतर्गत निधी दिला जाईल. नाशिक रिंग रोड प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या जमिनीच्या खरेदीवरील मुद्रांक शुल्कात सवलतीस मंजुरी देण्यात आली. मृदा व जलसंधारण विभागाच्या सुधारित रचनेला अंतिम स्वरूप देण्यात आले. राज्यात अंदाजे ८,७६७ पदांना मंजुरी देण्यात आली आहे, ज्यामध्ये विभागासाठी ६,४८१ आणि महाराष्ट्र जलसंधारण महामंडळासाठी दोन पदांचा समावेश आहे, ज्यामुळे एकूण ६,४८३ पदे म्हणजेच २,२८४ अतिरिक्त पदे निर्माण झाली आहेत.

# एसटीची भाडेवाढ लवकरच!

**मुंबई (प्रतिनिधी)** – डिझेलची मोठी दरवाढ झालेली आहे. डिझेल दरवाढीमुळे सुमारे १२५ कोटींचा अतिरिक्त भार एसटी महामंडळावर येणार आहे. त्यामुळे आता एसटी बस तिकीट दरातही वाढ होणार का, याबाबत चर्चा सुरू असताना, मंत्री प्रताप सरनाईक यांनी मोठे संकेत दिले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आवाहन आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार प्रताप सरनाईक यांनी ऑनलाइन बैठका घेतल्याची माहिती मिळाली आहे.

माध्यमांशी बोलताना प्रताप सरनाईक म्हणाले की, काही निर्णय हे कटू असले तरी ते आता घ्यावे लागतील. महागाई अशा पद्धतीने वाढत राहिली, तर महामंडळ जगवण्यासाठी, टिकवण्यासाठी काही निर्णय आम्हाला घ्यावेच लागतील. १ लाख कामगारांचा पगार द्यायचा आहे. महामंडळाच्या सुविधाही सुरू राहिल्या हव्यात. १४ हजार २५० बस रस्त्यावर धावतात, असे प्रताप सरनाईक यांनी म्हटले आहे.

एसटी बस प्रवासात महिलांना जी सूट दिलेली आहे, त्याचे पैसे राज्य शासनाकडून आम्हाला मिळतात. दिव्यांग किंवा समाजातील काही घटकांना मोफत प्रवासाची सुविधा आहे. ते पैसेही राज्य शासन आम्हाला देत आहे. ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास आहे, ते पैसे शासन देते. असे असले तरी शेवटी एसटी महामंडळाला सक्षमतेकडे वाटचाल करावी लागणार आहे. त्यामुळे राज्य शासनाकडून अजून किती पैसे घ्यायचे, ज्या ज्या वेळेस गरज पडते, तेव्हा आम्ही शासनाकडे पैसे मागतो. नवीन बस घ्यायच्या असतील, तर शासनाकडे पैसे मागतो. प्रत्येक गोष्टीसाठी शासन पैसे देते. एसटी स्टँड बांधणे, दुरुस्ती/सुधारणा करणे यासाठी पैसे आम्ही शासनाकडून घेतो. इतर सोयी-सुविधांसाठी शासन आम्हाला पैसे देते, अशी माहिती प्रताप सरनाईक यांनी दिली.

ज्या काही गोष्टी अपरिहार्य आहेत, त्यासाठी आम्हाला निर्णय घ्यावे लागणार आहेत. २०३५ पर्यंत एसटी महामंडळाच्या सगळ्या बस इलेक्ट्रिक करण्याचा निर्धार आम्ही केलेला आहे. आता आम्ही ८ हजार बस डिझेल घेतलेल्या आहेत. परंतु, भविष्यात इलेक्ट्रिक बस विकत घेण्यावरच भर राहणार आहे. सगळ्या इलेक्ट्रिक बस घेतल्या तरी त्याला चार्जिंग स्टेशन लागणार आहे. राज्यात एसटी महामंडळाच्या २०० ठिकाणी चार्जिंग स्टेशन उभे करण्यासाठी निविदा प्रक्रिया करत आहोत, असेही सरनाईक म्हणाले.

## Change In Name

My Old Name is **RAMESH TULSANE** which now I am changing as New Name **RAMESH KANHAIYALAL TULSANI.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - Bhatiya Complex, Vazirabad, Shivajinagar, Nanded Maharashtra 431602**
**Mo.No. 9823400101**

## Change In Name

My Old Name is **FAROOQ HUSSAIN KASIM PIRON** which now I am changing as New Name **FAROOQ HUSSAIN KASIM SAHAB BADVEL.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - H.No. 9-5-957, Raza Nagar, Shaktinagar, Kela Market, Itwara Post Itwara, Nanded MS. 431604 Mo.No. 9890012253**

## Change In Name

My Old Name is **INSHA SADAF KAZI ASKARUL ABEDIN** which now I am changing as New Name **INSHA SADAF KAZI ASKARUL ABEDDIN.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - H.No. 19/113, Labour Colony, Post Shivajinagar, Nanded MS. 431602**
**Mo.No. 9545060707**

## Change In Name

My Old Name is **KAUSAR** which now I am changing as New Name **KAUSAR SULTANA.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - H.No. 19/113, Labour Colony, Post Shivajinagar, Nanded MS. 431602**
**Mo.No. 9545060707**

# प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला २० मेपासून प्रारंभ

**मुंबई (प्रतिनिधी)** – दहावीनंतरच्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी व तंत्रज्ञान तसेच वास्तुकला पदविका (पॉलिटेक्निक) अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता प्रवेश प्रक्रिया दिनांक २० मे २०२६ पासून सुरू होत आहे. ही प्रवेश प्रक्रिया वेळेत आणि नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यासाठी कालबद्ध नियोजन करण्याचे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले आहेत. मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, विद्यार्थ्यांना प्रगतीपथावर नेणाऱ्या विविध विद्याशाखांमध्ये तंत्र शिक्षण ही अत्यंत महत्त्वाची शाखा आहे. या शाखेमधून विद्यार्थ्यांना तंत्रज्ञ, अभियंता तसेच उद्योजक होण्याची संधी उपलब्ध होते. दहावीनंतर तीन वर्षांच्या कालावधीचा पदविका अभ्यासक्रम पूर्ण करून विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी क्षेत्रात करिअर घडविण्याबरोबरच रोजगार व उद्योग क्षेत्रातही मोठ्या संधी उपलब्ध होतात. पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण



विद्यार्थ्यांना कॅम्पस प्लेसमेंटमधूनच रु. १ लाख प्रति महिना पगाराच्या नोकऱ्या औद्योगिक क्षेत्राकडून देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे तंत्रशिक्षणातील पदविका अभ्यासक्रम हा विद्यार्थ्यांसाठी एक उत्तम पर्याय ठरत आहे. तंत्रशिक्षण संचालकांच्या मार्गदर्शनाने, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाकडून पदविका अभ्यासक्रमासाठी NEP 2020 अनुरूप अद्यावत 'K Scheme' अभ्यासक्रम उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

## अधिकाऱ्यांनी लोकाभिमुख प्रशासनाचे मॉडेल उभारावे- बावनकुळे

**मुंबई (प्रतिनिधी)** – महसूल विभागाने लोकाभिमुख होऊन काम करणे अपेक्षित आहे. याअनुषंगाने शासकीय पदाचा लोकोपयोगी कामांसाठी उपयोग करुन गतिमान आणि पारदर्शक कामांचे नाविन्यपूर्ण मॉडेल सादर करावे, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हा प्रशासनाच्या कामाचा सर्वसमावेशक आढावा घेतला. कौशल्यविकास मंत्री तथा जिल्ह्याचे सह पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार विक्रांत पाटील, जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

## टी.सी. हरवली

अंबादास तुळशीराम बोडके या नावाची दहावी पास टीसी दिनांक १२ मे २०२६ मुखेड ते बाऱ्हाळी बस प्रवासादरम्यान माझी टीसी असलेली बॅग इतर कागदपत्रा सह हरवली आहे जर कोणाला सापडल्यास खालील नंबर ला संपर्क करावे.

**अंबादास तुळशीराम बोडके**
**जाहुर ७०३०२०३०९३**

## टी.सी. हरवली

माझी शिंदे सुनील इंद्रजीतराव या नावाची बी.ए .प्रथम वर्षात शिकत असलेली टीसी व महत्त्वाचे कागदपत्र असलेले बॅग मुखेड-नांदेड प्रवासात हरवली आहे, कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

- संपर्क पता -
**शिंदे सुनील इंद्रजीतराव**
रा. केरूर ता. मुखेड जि. नांदेड.






## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. गिरीष सुरेशराव बुलबुले, गोविंद सुरेशराव बुलबुले व मनिषा गोविंद बुलबुले रा.नांदेड यांनी मौ. कौठा ता.जि. नांदेड गट क्र. ८२ मधील प्लॉट क्र. ३५, ४२, ४३, ४४, ५४, ६४, ८५, ५५, ५६, ५८, ५९, ६२, ६३, ६७, ६८ तसेच गट क्र. ८४ मधील प्लॉट क्र. ७२, ७९, २२, २३, २४, २५, २७, ३०, ३१, ४३, ४४, ४८, ५५, ६४, ८६, ८७, ८८, ११५, १११, ११२, ११३, ११४, ४६, ५४, १२६, १२७ जमिन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार अकृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेंव्हा मौ. कौठा ता.जि. नांदेड गट क्र. ८२ मधील प्लॉट क्र. ३५, ४२, ४३, ४४, ५४, ६४, ८५, ५५, ५६, ५८, ५९, ६२, ६३, ६७, ६८ तसेच गट क्र. ८४ मधील प्लॉट क्र. ७२, ७९, २२, २३, २४, २५, २७, ३०, ३१, ४३, ४४, ४८, ५५, ६४, ८६, ८७, ८८, ११५, १११, ११२, ११३, ११४, ४६, ५४, १२६, १२७ जमिन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार अकृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरचे हस्तांतरणाच्या व्यवहारास कुणाचाही आक्षेप नाही. असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही पाची नोंद घ्यावी.

उपजिल्हाधिकारी (सामान्य)
जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड

## जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्री. मिर्झा अरशद बेग अब्दुल जलील बेग वय ४२ रा. १-१३-८, पिरबुऱ्हान नगर, गल्ली नं. १. नांदेड ता. जि. नांदेड यांनी दिनांक १३.०२.२०२६ रोजी या कार्यालयात त्यांचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

जन्म झालेल्याचे नाव श्री. मिर्झा अरशद बेग अब्दुल जलील बेग वय ४२ रा. १-१३-८, पिरबुऱ्हान नगर, गल्ली नं. १. नांदेड ता. जि. नांदेड मो. नं. ७७९८४९७७८२ यांचा राहते घर १-१३-८, पिरबुऱ्हान नगर, गल्ली नं. १, नांदेड ता. जि. नांदेड या ठिकाणी दिनांक ०२.०३.१९८३ या दिवशी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणे करीता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात दिनांक १३.०२.२०२६ रोजी तहसिल कार्यालय नांदेड येथे अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

तहसिलदार नांदेड करिता

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.८९८

नाव परिवर्तन वार्ड क्र. २१ अमालमत्ता क्र. ५२७ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, आनंद सुरज प्रल्हाद कंधारकर रा. वाई बाजार ता. माहुर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ५२७ वार्ड न. २१ सय्यद शारेख अली सय्यद अझर अली यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ६२९/२०२६ दि. २२/०४/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - प्लॉट क्र. ६८, पश्चिमेस - ३० फुटाचा रस्ता, दक्षिणेस -प्लॉट क्र. ७२, उत्तरेस - प्लॉट क्र. ६९.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.८९७

नाव परिवर्तन वार्ड क्र. १९ मालमत्ता क्र. ११४ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, शेख मिरासाब शेख महेबुब रा. खैरगाव ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ११४ वार्ड न. १९ महम्मद हनिफ अब्दुल करीम कुरेशी यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ६२६/२०२६ दि. २९/०४/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - शेख अंजुम शेख इब्राहिम, पश्चिमेस - शेख युनुस शेख अब्दुल वाहेद, दक्षिणेस - रस्ता, उत्तरेस - शेख इम्रान शेख गुलाब.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.८९६

नाव परिवर्तन वार्ड क्र. ९ मालमत्ता क्र. ५७/१ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, मुबीन वकील शेख रा. हिमायतनगर ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ५७/१ वार्ड न. ०९ हमरूनबी नूर महम्मद यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ८५४७७१/२०२६ दि. २३/०४/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - -----, पश्चिमेस - ------, दक्षिणेस ------, उत्तरेस - -----

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.८९५

नाव परिवर्तन वार्ड क्र. १० मालमत्ता क्र. ४० या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, नंदकुमार लक्ष्मणराव गोविंदवार रा. हिमायतनगर ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ४० वार्ड न. १० प्रवीण नंदकुमार गोविंदवार यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ८५४९५५/२०२६ दि. ०६/०५/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - मुबीन शेठ, पश्चिमेस - शेख मोईन, दक्षिणेस -नांदेड-किनवट रोड, उत्तरेस - कॉलनी रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३०६

नाव परिवर्तन वार्ड क्र. १७ मालमत्ता क्र. २२/१ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, परमेश्वर नागोराव आरटवार रा. हिमायतनगर मोहल्ला हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. २२/१ वार्ड न. १७ रमेश नागोराव आरटवार यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ९२५११३/२०२६ दि. १२/०५/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - गजानन जालेवाड, पश्चिमेस - बोम्पीलवार, दक्षिणेस - रस्ता, उत्तरेस - दत्ता तुंगलवाड

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३०५

नाव परिवर्तन वार्ड क्र. १८ अ मालमत्ता क्र. ६७३ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, अब्दुल सत्तार अब्दुल अजीज रा. हिमायतनगर मोहल्ला हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ६७३ वार्ड न. १८ अ अब्दुल रज्जाक अब्दुल अजीज यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ५७एबी/८६८११८ दि. ०५/०५/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - रस्ता, पश्चिमेस - प्लॉट क्र. ६२, दक्षिणेस -प्लॉट क्र. ६६, उत्तरेस - प्लॉट क्र. ६८.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३०३

नाव परिवर्तन वार्ड क्र. १७ मालमत्ता क्र. ८९ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, शिवाजी माधवराव जरगेवाड रा. सिरंजनी ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ८९ वार्ड न. १७ मारोती नरसिंगराव जाधव यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. २१८३/२०२६ दि. ०५/०३/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - सुनिल गणपत ढगे व गुंठेवारीप्रमाणे शंकर विठोबा, पश्चिमेस - प्लॉट क्र. २, दक्षिणेस -मनोहर तुकाराम जाधव व गुंठेवारी जिजाबाई आहे, उत्तरेस - १५ फुट रूंद रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३०१

नाव परिवर्तन वार्ड क्र. २१ मालमत्ता क्र. ७१८ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, संतोष तुळशीराम बनसोडे रा. साठेनगर ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ७१८ वार्ड न. २१ शबाना बेगम शेख मुजीब यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. २१२९/२०२५ दि. १९/०५/२०२५ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - न.पा. मालमत्ता क्र. ७२३, पश्चिमेस - रोड, दक्षिणेस -न.पा. मालमत्ता क्र. ७१९, उत्तरेस - न.पा. मालमत्ता क्र. ७१७

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.९००

नाव परिवर्तन वार्ड क्र. १८ अमालमत्ता क्र. ९३/२ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, आनंद अवधुतराव बचकलवाड रा. शिबदरा ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ९३/२ वार्ड न. १८ अ सुरेश धनसिंग राठोड यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. २९२/२०२६ दि. १०/०२/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - सर्व्हे नं. १६९, पश्चिमेस - प्लॉट क्र. ७१, दक्षिणेस -प्लॉट क्र. ७९, उत्तरेस - कॉलनी रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३०४

नाव परिवर्तन वार्ड क्र. १८ अ मालमत्ता क्र. ६७३ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, सलमान खान समद खान रा. हिमायतनगर मोहल्ला हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ६७३ वार्ड न. १८ अ अब्दुल रज्जाक अब्दुल अजीज यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ५७एबी ८६८११९/२०२६ दि. ०५/०५/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - रस्ता, पश्चिमेस - प्लॉट नं. ६२, दक्षिणेस -प्लॉट नं. ६६, उत्तरेस - प्लॉट नं. ६८.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३०२

नाव परिवर्तन वार्ड क्र. ८ मालमत्ता क्र. १२७/१ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, शेख इसाक शेख मिरासाब रा. उमरचौक, हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. १२७/१ वार्ड न. ०८ फातेमाबी शेख अमीर व इतर यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ६४४/२०२६ दि. ०५/०५/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - शेख महेबुब शेख अमीर, पश्चिमेस - शेख सलील शेख इसाक, दक्षिणेस -लिहुन घेणार यांची जागा, उत्तरेस - रस्ता

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.८९९

नाव परिवर्तन वार्ड क्र. १९मालमत्ता क्र. ४१८ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, सालेहा परवीन शेख कलीम व इतर रा. जनता कॉलनी, हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ४१९ वार्ड न. १९ सय्यद बिलाली सय्यद जलील यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ६२८/२०२६ दि. २९/०४/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - कॉलीन रस्ता, पश्चिमेस - प्लॉट क्र. ५८, दक्षिणेस -नूरजहा बेगम शेख लाल, उत्तरेस - प्लॉट क्र. २८.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात
गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



## पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308




# शेतकरी, सामान्य नागरिकांपर्यंत जास्तीत जास्त शासकीय योजना पोहोचवा -महापौर कविता मुळे

**○ छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर संपन्न ○ मान्यवरांच्या हस्ते विविध लाभार्थ्यांना लाभाचे वितरण**

**नांदेड (प्रतिनिधी)** –राज्य शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाच्या माध्यमातून शेतकरी, सामान्य नागरिक तसेच विविध घटकांपर्यंत शासनाच्या योजना प्रभावीपणे पोहोचविण्याचे काम सुरू आहे. या अभियानामुळे नागरिकांना एकाच ठिकाणी विविध योजनांचा लाभ मिळत असून शासन आणि जनतेतील दुवा अधिक मजबूत होत आहे, असे प्रतिपादन नांदेडच्या महापौर कविता मुळे यांनी केले.



नांदेड तहसील कार्यालयात आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरात त्या बोलत होत्या. यावेळी नांदेड दक्षिणचे आमदार आनंदराव बोंढारकर, नांदेड उत्तरचे आमदार बालाजीराव कल्याणकर, महापालिका उपमहापौर दीपकसिंह रावत, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड, तहसीलदार संजय वारकड यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

महापौर कविता मुळे म्हणाल्या की, छत्रपती शिवाजी महाराजांनी जनकल्याणाला सर्वोच्च प्राधान्य दिले होते. त्याच प्रेरणेने महसूल विभाग आणि इतर शासकीय यंत्रणा नागरिकांची कामे जलदगतीने मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील आहेत. विशेषतः ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत योजनांची माहिती आणि प्रत्यक्ष लाभ पोहोचविण्याचे काम या अभियानातून प्रभावीपणे होत असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार आनंदराव बोंढारकर यांनी शासन आपल्या दारी या संकल्पनेचा उल्लेख करत सांगितले की, शासनाने नागरिकांना थेट लाभ देण्यासाठी विविध उपक्रम राबविले आहेत. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वाखाली लोकाभिमुख निर्णय घेतले जात असून या शिबिरांमुळे नागरिकांचे प्रश्न जागेवर सोडवले जात आहेत. लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ तत्काळ देण्यात येत असल्याने प्रशासनाविषयीचा विश्वास अधिक दृढ होत असल्याचे त्यांनी नमूद केले. आमदार बालाजी कल्याणकर यांनी सांगितले की, नांदेड तहसील कार्यालयाने आतापर्यंत आठ मंडळांमध्ये महाराजस्व समाधान शिबिरे आयोजित केली आहेत. या शिबिरांच्या माध्यमातून अधिकारी थेट गावांमध्ये जाऊन लाभार्थ्यांना सेवा आणि योजनांचे लाभ देत आहेत. त्यामुळे नागरिकांचा वेळ, पैसा आणि कार्यालयीन त्रास मोठ्या प्रमाणात कमी झाला असून, आतापर्यंत सुमारे २५ हजार लाभार्थ्यांनी या अभियानाचा लाभ घेतल्याची माहिती त्यांनी दिली.

**एजंटांच्या माध्यमातून नव्हे, थेट प्रशासनाशी संपर्क साधा- जिल्हाधिकारी**

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ घेताना कोणत्याही मध्यस्थ किंवा एजंटांच्या भूलथापांना बळी पडू नये, असे आवाहन केले. प्रशासनाकडून थेट सेवा देण्यावर भर दिला जात असून, नागरिकांनी अधिकृत माध्यमातूनच अर्ज आणि संपर्क साधावा, असे त्यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले की, जिल्ह्यात आपले सरकार सेवा केंद्र अधिक सक्षम करण्यात येत असून ग्रामपंचायत स्तरावर सुमारे ५०० सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्यामुळे नागरिकांना तालुका किंवा जिल्हा स्तरावर वारंवार फेऱ्या मारण्याची गरज भासणार नाही.

## खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बलांसाठी मोफत 'ड्रोन पायलट' प्रशिक्षण

**नांदेड (प्रतिनिधी)**– शेती, फोटोग्राफी, सर्वेक्षण आणि सुरक्षा क्षेत्रातील वाढती व्याप्ती पाहता, महाराष्ट्र शासनाच्या 'अमृत' (महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी) संस्थेमार्फत खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी मोफत ड्रोन पायलट प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या प्रशिक्षणानंतर उमेदवारांना अधिकृत ड्रोन पायलट परवानाही मिळणार आहे.

योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये: पूर्णतः मोफत प्रशिक्षण: सहसा या प्रशिक्षणासाठी लागणारा लाखो रुपयांचा खर्च 'अमृत' संस्थेमार्फत केला जातो. राहण्याची व जेवणाची सोय: १० दिवसांच्या या प्रशिक्षण कालावधीत उमेदवारांच्या निवास आणि भोजनाची व्यवस्था संस्थेतर्फे मोफत केली जाते. रोजगाराची संधी: ग्रामीण भागातील युवकांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण देऊन त्यांना स्वयंरोजगारासाठी सक्षम करणे हा या योजनेचा मुख्य हेतू आहे. पात्रता आणि अटी: प्रवर्ग: उमेदवार खुल्या प्रवर्गातील असावा ज्यांना इतर कोणत्याही शासकीय महामंडळाचा लाभ मिळत नाही. उत्पन्न मर्यादा: कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा कमी असावे. वय: १८ ते ५५ वर्षांच्या दरम्यान. शिक्षण: किमान १२ वी उत्तीर्ण. प्राधान्य: शेतकरी कुटुंबातील उमेदवारांना विशेष प्राधान्य दिले जाईल. वैद्यकीय प्रमाणपत्र: अर्जासोबत वैद्यकीय अधिकाऱ्यांचा 'फिटनेस दाखला' असणे अनिवार्य आहे. संपर्क आणि अर्ज प्रक्रिया: नांदेड जिल्ह्यातील इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी अधिक माहितीसाठी व अर्जासाठी खालील पत्त्यावर संपर्क साधावा: अमृत कार्यालय, नांदेड पत्ता: अमृत कार्यालय, गिरिजात्मक मार्ग, मोरेश्वर मार्ग, अष्टविनायक नगर, तरोडा नाका, नांदेड. संपर्क क्रमांक: ७३९१०६५४७२ अमृतच्या इतर योजनांसाठी आणि अधिक माहितीसाठी वरील पत्त्यावर किंवा कार्यालयात प्रत्यक्ष संपर्क साधावा. तसेच, ऑनलाइन अर्जासाठी https://app.mahaamrut.org.in/amrut-new/scheme/245 या लिंकचा वापर करावा. आवाहन: जास्तीत जास्त गरजू युवकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन आपले भविष्य उज्ज्वल करावे.

## शनी अमावस्येनिमित्त हडको येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –हडको येथील श्री शनी मंदिर व संकटमोचन हनुमान मंदिर देवस्थान येथे शनिवार, दि. १६ मे शनिवार रोजी योग त्रिकुट पर्व काळ योग श्री शनी जयंतीच्या शनि अमावास्येचा निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हडको येथील श्री शनिदेव व श्री संकट मोचन हनुमान मंदिर देवस्थान श्री शनिदेव जयंती सोहळ्यानिमित्त दि. १६ मे रोजी सकाळी महाअभिषेकासह विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी गोळवलकर गुरुजी रक्त पेढीचा रक्तदान शिबीर आयोजन सकाळी ८ ते १२ दरम्यान करण्यात आले आहे. १६ मे रोजी सकाळी ६.३० वाजता ५१ किलो तेलाचा अभिषेक, हनुमान चालीसा, शनि चालीसा, आरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी शनिदेवतेचा ५१ किलो तेलाचा सामुदायिक अभिषेक गुरु शशिकांत कुलकर्णी महाराज यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी आजीवन अन्नदात्यांसह यजमान व ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष करणसिंह ठाकूर, माधवराव कदम, गोपीनाथ कहाळेकर, संजय जाधव, किशनराव रामपल्ली, बाळासाहेब चव्हाण, त्र्यंबक सरोदे, गोविंद मेटकर, दत्तात्रय सागुरे, शिवाजी पाटील आढाव, प्रा. अशोक मोरे, देवबा कुंचेलीकर, निवृत्तीराव जिंकलवाड, खुशाल कदम,किशोर देशमुख यांनी केले आहे.

## हणमंतराव गायकवाड यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** –मुखेड तालुक्यातील चांडोळा येथील शेतकरी व माजी चेअरमन हणमंतराव ईरबाजी पाटील गायकवाड (१०६) यांचे गुरुवार, दि.१४ मे रोजी सायंकाळी ५ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर शुक्रवार, दि.१५ मे रोजी दुपारी ४ वाजता शोकाकुल वातावरणात चांडोळ्यात अंत्यसंस्कार करण्यात आले. सेवा सहकारी सोसायटीचे ते तब्बल अकरा वर्ष चेअरमन होते. त्यांच्या पश्चात ३ मुले, २ मुली, नातवंडे, पंतवंडे असा परिवार आहे.

## अवैध वाळू उपसा प्रकरणी पोलिसांची कारवाई; ४० लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरापासून जवळ असलेल्या गोदावरी नदी किनारी विष्णुपुरी परिसरात नांदेड ग्रामीण पोलिसांनी अवैध रेती उपसा करणाऱ्यांविरोधात मोठी कारवाई करत तब्बल ३९ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पथकाने दि. १४ मे रोजी मध्यरात्री गुप्त माहितीच्या आधारे छापा टाकला. यावेळी गोदावरी नदीपात्रातून अवैधरित्या रेती उपसा सुरू असल्याचे आढळून आले. पोलिसांची चाहूल लागताच दोन जण वाळू उपसा करणारे घटनास्थळावरून पसार झाले. कारवाईदरम्यान एक ट्रॅक्टर ज्यात एक ब्रास रेती होती, पाण्यात तरंगणारे ३२ तराफे तसेच रेती उपसा करण्यासाठी वापरली जाणारी चार इंजिने जप्त करण्यात आली. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत ३९ लाख ५५ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.



या प्रकरणी गजानन व्यंकटी वाघमोडे (वय २५, रा. बेटसांगवी ता. लोहा) व आनंद गोविंदराव गोळेगावले (रा. जक्कल ता. लोहा, ट्रॅक्टर मालक) यांच्यासह दोन अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या कारवाईत भारतीय न्याय संहिता, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, पर्यावरण संरक्षण अधिनियम सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोलीस उपनिरीक्षक व्यंकट कुसमे तसेच पोलीस अंमलदार वसंत केंद्रे, मारोती पंचलिंग, विनोद पवार, सचिन चावरे, समीर अहेमद, शंकर माळगे यांनी कारवाई पूर्ण केली.

## सौ. शांताबाई कदम यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** – लोहा तालुक्यातील वाळकी (खुर्द)येथील रहिवासी सौ. शांताबाई तातेराव कदम (वय ५५ वर्षे) यांचे अल्पशा आजाराने गुरुवार, दि. १४ मे रोजी संध्याकाळी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दि. १५ रोजी दुपारी अंत्पयसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, सून, तीन मुली, जावई असा परिवार असून, त्या नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सेवानिवृत्त तपासणी अधिकारी अशोक कदम यांच्या भावजयी तर किसान विद्यालय उमरा येथील सेवानिवृत्त वरिष्ठ लिपीक तातेराव विठ्ठलराव कदम यांच्या पत्नी होत.

## संजय पेंटलवाड यांचे मुंबईत निधन

**शंकरनगर (प्रतिनिधी)** – नायगाव तालुक्यातील शेळगाव गौरी येथील सुपुत्र तथा महाराष्ट्र सुरक्षाबल दलात मुंबई येथे कार्यरत असलेले संजय भुजंग पेंटलवाड यांचे शुक्रवार, दि. १५ मे रोजी पहाटे मुंबई येथे कर्तव्य बजावत असताना हृदयविकाराच्या झटक्याने वयाच्या २७ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शनिवार, दि. १६ मे रोजी शेळगाव गौरी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. संजय पेंटलवाड यांच्या पश्चात वयोवृद्ध माता-पिता, पत्नी आणि दोन बहिणी असून ते जिल्हा परिषद शिक्षक सर्जेराव नारायण पेंटलवाड यांचे पुतणे होत.



## जागतिक पर्यावरण दिन अभियानांतर्गत 'पर्यावरण संरक्षण शपथ' व स्वाक्षरी अभियानाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** –भारतीय रेल्वेमध्ये १५ मे ते ५ जून २०२६ या कालावधीत हवामान बदल व पर्यावरण संरक्षण या विषयावर आयोजित करण्यात येत असलेल्या जागतिक पर्यावरण दिन अभियानांतर्गत दक्षिण मध्य रेल्वेच्या हज़ूर साहिब नांदेड मंडळातर्फे शनिवार, दि. १६ रोजी जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.



मंडल रेल व्यवस्थापक कार्यालय, हज़ूर साहिब नांदेड येथे पर्यावरण संरक्षण शपथ व स्वाक्षरी अभियान आयोजित करण्यात आले. यामध्ये रेल्वे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवून पर्यावरण संरक्षण व शाश्वत जीवनशैली अंगीकारण्याचा संकल्प केला.

यावेळी प्रदीप कामले, विभागीय रेल्वे व्यवस्थापक, नांदेड यांनी मंडळ कार्यालयातील उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना पर्यावरण संरक्षणाची शपथ दिली. कार्यक्रमादरम्यान उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या दैनंदिन जीवनात पर्यावरण संरक्षणासाठी शक्य ते सर्व सकारात्मक बदल करण्याची तसेच आपल्या कुटुंबीय, मित्र व इतर नागरिकांना पर्यावरणपूरक सवयी व आचरण स्वीकारण्यासाठी सतत प्रेरित करण्याची शपथ घेतली. याशिवाय हज़ूर साहिब नांदेड, छत्रपती संभाजीनगर, जालना, नगरसूल, परभणी, पूर्णा, वाशिम आदी रेल्वे स्थानकांवरही पर्यावरण संरक्षणाची शपथ देण्यात आली. यामुळे रेल्वे कर्मचारी व प्रवाशांमध्ये पर्यावरण संरक्षण तसेच हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांविषयी जनजागृती करण्यात आली.

## महिला लोकशाही दिनाचे १८ मे रोजी आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** – समस्याग्रस्त व पीडित महिलांसाठी सोमवार, दि. १८ मे २०२६ रोजी महिला लोकशाही दिन आयोजित केला आहे. समस्याग्रस्त व पीडित महिलांनी महिला लोकशाही दिनाच्या दिवशी आपले अर्ज विहित नमुन्यात सादर करावे, असे आवाहन जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन समितीचे अध्यक्ष तथा बाल विकास अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन घेण्यात येतो. सोमवार १८ मे २०२६ रोजी सकाळी ११ वा. जिल्हाधिकारी नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली महसूल प्रबोधिनी (प्रशिक्षण केंद्र), एसबीआय एटीएमच्या मागे, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर नांदेड येथे महिला लोकशाही दिन होणार आहे. संबंधित समितीचे सदस्य व शासन निर्णयात नमूद संबंधित विभागाचे अधिकारी यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## तोतया पोलिसांकडून ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरातील पाकिजा फंक्शन हॉलसमोर पोलीस असल्याचे भासवून दोन अज्ञात भामट्यांनी एका ज्येष्ठ व्यापाऱ्याची फसवणूक केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. ही घटना १४ मे रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास घडली.

दामोदर हनुमानदास जाजू (वय ६१, रा. सिद्धीधाम अपार्टमेंट, नांदेड) हे रस्त्याने जात असताना दोन अनोळखी इसमांनी त्यांना अडवले. संबंधितांनी स्वतःला पोलीस असल्याचे सांगत परिसरात चोरीच्या घटना वाढल्याचे कारण पुढे केले. त्यांनी दामोदर जाजू यांच्या गळ्यातील सोन्याची चैन व हातातील अंगठी सुरक्षित ठेवण्याच्या बहाण्याने काढून घेण्यास सांगितले. दागिने पिशवीत ठेवत असल्याचे नाटक करून भामट्यांनी ते स्वतःकडेच ठेवले आणि क्षणात तेथून पसार झाले. या फसवणुकीत अंदाजे ६५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास करण्यात आले आहेत. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ३१९ (२), ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अर्धापूर तालुक्यातील उमरी पाटीवर ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**अर्धापूर (प्रतिनिधी)** – मालेगाव ते वसमत रोडवरील उमरी पाटीजवळ ट्रकने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने या अपघातात कपिल सुदाम आठवले (वय ३६, रा. उमरी ता. अर्धापूर) हे ठार झाले आहेत. हा अपघात शुक्रवार, दि.१५ मे रोजी सायंकाळी ६ वाजता झाला आहे.

कपिल आठवले हे आपल्या दुचाकीवरून नांदेड येथील विवाह सोहळा आटोपून उमरीकडे जात होते. उमरी पाटीजवळ ते गावाकडे वळत असताना पाठीमागून येणाऱ्या ट्रकने (क्र. आर.जे.११ जी. सी. २८३३) दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, ट्रकने कपिल आठवले यांना काही अंतरापर्यंत फरफटत नेले. अपघाताची माहिती मिळताच जगद्गुरु नरेंद्रचार्य महाराज संस्थानच्या रुग्णवाहिकेचे चालक राजू पाचंगे व महामार्ग पोलिसांनी घटनास्थळी जाऊन जखमी कपिल आठवले यांना तातडीने अर्धापूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी त्यांना तपासून 'मृत' घोषित केले.



या अपघातामुळे रस्त्यावर काही काळ वाहतुकीची कोंडी झाली होती. सपोउपनी गुट्टे, जमादार विश्वनाथ इंगळे, सलिम माणिकपेठे, जहीर फारूखी, संदीप चटलेवार, धनराज पुरी, जसप्रितसिंघ शाहु, चालक गौतम कांबळे, सेवक वसंत सिनगारे यांनी घटनास्थळी मदत केली. अपघातग्रस्त वाहने बाजूला करून वाहतूक सुरळीत केली. मृत कपिल आठवले यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, दोन लहान मुले आणि भावंडे असा परिवार आहे. त्यांचा अपघाती मृत्यू झाल्याने उमरी गावात आणि परिसरात शोककळा पसरली आहे.

**दिल्लीच्या तख्तासमोर दुमदुमला शंभूराजांचा जयघोष**

## राजधानीत छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव सोहळा उत्साहात

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** –'शिवपुत्र छावा' आणि 'विश्वातील सर्वोत्तम राजपुत्र' छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३६९ व्या जयंतीनिमित्त देशाची राजधानी नवी दिल्ली येथे अभूतपूर्व भगवेमय वातावरण पाहायला मिळाले. अखिल भारतीय छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव समितीच्या वतीने येथील 'महाराष्ट्र सदन' येथे राष्ट्रीय स्तरावरील भव्य जन्मोत्सव सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. या सोहळ्यात छत्रपती संभाजी महाराजांच्या शाही पोशाखात अवतरलेल्या छोटा रायबा सूर्यवंशी याच्या निरागस पण बाणेदार भाषणाने उपस्थित मान्यवरांसह तमाम शिवप्रेमींची मने जिंकली.

**'छोटा रायबा'च्या हुंकाराने सभागृह भारावले!**

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरलेल्या चिमुकल्या रायबाने आपल्या बोबड्या भाषेतून छत्रपती संभाजी महाराजांच्या अचाट शौर्याचा आणि पराक्रमाचा महिमा गायला. त्याचे हे बाणेदार शब्द ऐकून संपूर्ण सभागृह भारावून गेले होते. रायबाच्या या सादरीकरणाला उपस्थित जनसमुदायाने उभे राहून टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. पुढची पिढी इतिहासाच्या योग्य आणि जाज्वल्य संस्कारांत घडत आहे, अशी भावना यावेळी अनेक ज्येष्ठांनी व्यक्त केली.

**'मराठ्यांचा लढाऊ स्वाभिमान जोपासा' - वैभव डांगे**

दिल्लीवर जयंतीच्या निमित्ताने भगवा फडकावणारा स्वाभिमान पाहायला मिळत आहे, अशा शब्दांत कार्यक्रमाचे अध्यक्ष वैभव डांगे यांनी आपल्या मार्गदर्शनात मराठ्यांच्या देदीप्यमान इतिहासाला उजाळा दिला.

ते पुढे म्हणाले की, पानिपतच्या पराभवानंतरही मराठ्यांनी खचून न जाता १७७१ मध्ये महादजी शिंदे महाराज यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीवर पुन्हा एकदा भगवा फडकावून आपले वर्चस्व सिद्ध केले होते. हाच स्वाभिमान आणि लढाऊ वृत्ती आजच्या तरुणाईने अंगी बाणवणे ही काळाची गरज आहे.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जामोदेकर बाबा, सुदर्शन टीव्हीचे सुदर्शन चव्हाणके, पानिपतचे रामनारायण, किशोर चव्हाण, डॉ. सिंकुकुमार सिंह आणि सुप्रीम कोर्टाचे ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. अमोल सूर्यवंशी उपस्थित होते. सर्व वक्त्यांनी शंभूराजांच्या सर्वोच्च बलिदानाचा आणि त्यांच्या अफाट प्रशासकीय कौशल्याचा गौरव केला.



यामध्ये इंजि. तानाजी हुस्सेकर, प्राचार्य डॉ. कमलाकर कनसे, डॉ. अविनाश पुयड, डॉ. प्रभाकर जाधव, श्याम जाधव, इंजि. एच. एम. पाटील, दीपक राजूरकर, शिवानंद पाटील, प्रा. अरविंद बोधनकर, संजय हंबर्डे, संजय वांगीकर, दत्ताराम मुंगल, प्रवीण कदम, केशव कल्याणकर, कैलास शिंदे, बबन पाटील, सर्वज्ञ हुस्सेकर, डॉ. रामानंद जाधव, डॉ. शिल्पा शेंडगे, डॉ. श्याम पाटील, अजय श्रीखंडे, अभिजीत सूर्यवंशी आणि स्नेहल सूर्यवंशी आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंजि. तानाजी हुस्सेकर यांनी केले, तर सूत्रसंचालन डॉ. प्रभाकर जाधव यांनी प्रभावीपणे सांभाळले. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. अरविंद बोधनकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.



फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com